संस्थापक



कै. दादापाटील गणपत केदार

॥ विद्या विनयेन शोभते ॥

श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ॥


ता.सिन्नर, जि.नाशिक. फोन : (०२५५१) २११९८७

महा.शासन मा.क्र. : एन.जी.सी.२००३/नमवि (१/०३) माशि - ३. दि.१५-०७-२००३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न क्रमांक : ID No. PU/NS/AC/74/2003.


E-mail : artsandcommercecollege_dodibk@rediff.com | AISHE Code : C-42105 | Website : www.dodicollege.org

: https ://www.facebook.com/groups/940272903319392/ | ISO - 9001 : 20151


वार्षिक नियतकालिक

# ब्रम्हानंद

सन २०२२



@ananya


❊ प्रकाशक :

प्रा. एस्. बी. भाबड

(प्रभारी प्राचार्य)

❊ संपादक :

प्रा.एन. बी.वाक्चौरे

(मराठी विभाग प्रमुख)

## ।। आमचे स्फुर्तीस्थान ।।



## स्व.दादापाटील गणपत केदार

।। विद्या विनयेन शोभते ।।

श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे...

**कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ।।**

ता.सिन्नर, जि.नाशिक - ४२२ ६०६

फोन : (०२५५१) २९९९८७

महाराष्ट्र शासन मान्यता क्रमांक : एन.जी.सी.२००३/नमवि (१/०३) माशि - ३. दि.१५-०७-२००३

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न क्रमांक : ID No.: PU/NS/AC/74/2003.

E-mail : artsandcommercecollege_dodibk@rediff.com

Website : www.dodicollege.org ● AISHE Code : C-42105

: https ://www.facebook.com/groups/940272903319392/ ● ISO - 9001 : 2015 ●

वार्षिक नियतकालिक

# ब्रम्हानंद

सन २०२१-२०२२

● प्रकाशक ●

**प्रभारी प्राचार्य प्रा.भावड एस्. बी.**

● कार्यकारी संपादक ●

**प्रा.वाकचौरे निलेश भाऊसाहेब**

(मराठी विभाग प्रमुख)

वार्षिक नियतकालिक

# ब्रम्हानंद

सन २०२१-२०२२


| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ।। ता.सिन्नर, जि.नाशिक - ४२२ ६०६ |
| प्रकाशन काळ | : | वार्षिक |
| प्रकाशक | : | प्रभारी प्राचार्य प्रा.भाबड संदिप भागुजी द्वारा - ब्रम्हानंद प्रकाशन, श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ।।, ता.सिन्नर, जि.नाशिक - ४२२ ६०६ |
| कार्यकारी संपादक | : | प्रा.वाकचौरे निलेश भाऊसाहेब (मराठी विभाग प्रमुख) |
| मुद्रण | : | पंकज ऑफसेट, अकोले |
| मालकी | : | श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ।।, ता.सिन्नर, जि.नाशिक - ४२२ ६०६ |
| अंक | : | फक्त खाजगी वितरणासाठी |
| प्रती | : | ४०० |


या नियतकालिकेत व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखकाचे आहेत. त्यांच्याशी प्राचार्य, संपादक मंडळ, संस्था किंवा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही.

# प्राचार्य मनोगत...

श्री ब्रह्मानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ।। या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ चे माहितीपत्रक विद्यार्थ्यांच्या हाती सुपूर्त करताना मला विशेष आनंद होत आहे. आपले महाविद्यालय आपल्या संस्थेचे अध्यक्ष आदरणीय मा.श्री.पांडुरंग गणपत केदार यांचे मार्गदर्शनाखाली यशस्वीतेकडे वाटचाल करत आहे. याचा आम्हां सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना सार्थ अभिमान आहे.



प्रा.एस. बी. भावड
(प्रभारी प्राचार्य)

महाविद्यालयात विद्यार्थी केंद्रबिंदु मानून अध्ययन, अध्यापन, शैक्षणिक उपक्रम, संशोधन कार्य, आर्थिक व्यवस्थापन, शैक्षणिक वर्षातील प्रवेश, कार्यालयीन प्रशासन तसेच विद्यार्थ्यांच्या संबंधित उपक्रमाचे आयोजन केले जाते. उच्च शिक्षणातील गुणवत्ता सुधारणेसाठी व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात विशेष प्रयत्न केले जातात. या कामी महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमात तज्ञ व्यासंगी प्राध्यापकांचे योगदान उल्लेखनीय आहे. अद्ययावत वेबसाईट, परीक्षा विभाग, भाषा प्रयोगशाळा व कार्यालयाचे संगणकीकरण, ऑनलाईन ॲडमिशन, विद्यार्थ्यांसाठी तात्काळ ओळखपत्राची सुविधा, सुरक्षिततेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही.कॅमेरे, कॅन्टीन सुविधा महाविद्यालयात कार्यान्वित आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये २०० Mbps इंटरनेट कनेक्टीव्हीटी महाविद्यालयात कार्यान्वित झालेली आहे. तसेच 'गुणवत्ता सुधार योजने' अंतर्गत सोलर सिस्टिम लवकरच कार्यान्वित होत आहे. चालु शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ग्रंथालय विभागासाठी Koha सॉफ्टवेअर प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे तर महाविद्यालयाच्या लेखा परीक्षणासाठी Tally सॉफ्टवेअर कार्यान्वीत करण्यात येत आहे. या सर्व सुविधांचा विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सुधारणेसाठी फायदा करुन घ्यावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य या नात्याने करत आहे.

धन्यवाद !

प्रा.एस. बी. भावड
(प्रभारी प्राचार्य)




दि.२८ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबीर मौजे खंबाळे येथे राष्ट्रीय सेवा विशेष श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन प्रसंगी उपस्थित श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.पांडुरंग गणपत केदार, संचालक मा.श्री.रमेश रामभाऊ पाटील, मा.श्री.संपत कचरु शेळके, मा.श्री.निवृत्ती गणपत केदार, ह.भ.प.माधव महाराज आंधळे, उपसरपंच मा.श्रीमती सौ.जिजाबाई आंधळे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.एस. बी. भावड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रशांत उगले व प्रा.डॉ.श्रीमती एन. ए. शेख महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद तसेच उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक

दि.२८ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबीर मौजे खंबाळे येथे राष्ट्रीय सेवा विशेष श्रमसंस्कार शिबीर ध्वजारोहन प्रसंगी उपस्थित श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.पांडुरंग गणपत केदार, सामाजिक कार्यकर्ते व पी.एस.आय. मा.श्री.दत्तु आंधळे, तंटामुक्ती अध्यक्ष मा.श्री.विश्वनाथ आंधळे, उपसरपंच मा.श्रीमती सौ.जिजाबाई आंधळे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.एस. बी. भावड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रशांत उगले व प्रा.डॉ.श्रीमती एन. ए. शेख, प्रा.ए. एम. आव्हाड, महाविद्यालयाचा प्राध्यापक वृंद तसेच उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व विद्यार्थी स्वयंसेवक





महाविद्यालयात युवा महोत्सव अंतर्गत पारंपरिक वेशभूषा दिन प्रसंगी प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रशांत उगले व प्रा.डॉ.श्रीमती एन. ए. शेख, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.एन. बी. वाकचौरे, प्रा.ए. एम. आव्हाड, प्रा.एस. एस. आव्हाड, प्रा.बाबासाहेब कासार, प्रा.सोमेश्वर बलक, प्रा.राजेंद्र केदार, प्रा.श्रीमती कल्पना घुगे, प्रा.डॉ.एन. वाय. ब्राम्हणे, प्रा.आर. ए. केदार व विद्यार्थी वर्ग

दि.२५ सप्टेंबर २०२१ रोजी म. वि. प्र. समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वडनेर भैरव येथे NAAC अभ्यासभेट प्रसंगी उपस्थित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वडनेर भैरव आणि कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ॥ या दोन्ही महाविद्यालयांचे प्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक वृंद



# संपादकीय...

प्रिय रसिक वाचक हो,

महाविद्यालयाच्या ''ब्रम्हानंद'' (शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२) या नियतकालिकाचा अंक आपणा सर्वांच्या हाती देताना आम्हांस मनस्वी आनंद होत आहे. महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्र विभागात नाशिक हा एक प्रमुख जिल्हा असून या जिल्ह्यात राजकीय, ऐतिहासिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्ट्या उज्वल पार्श्वभूमी लाभलेला सिन्नर तालुका. या तालुक्याच्या दक्षिणेला श्री ब्रम्हानंद स्वामींच्या पदस्पर्शाने पावन झालेला दोडी गाव व इतर पंचक्रोशीतला परिसर. शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्याच्या उद्देशाने दोडी बु || गावचे भूमीपुत्र स्वर्गीय दादापाटील गणपत केदार यांनी सन १९७९ मध्ये श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. पुढे संस्थेचे वरिष्ठ महाविद्यालय सन २००३ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यात आले.



प्रा.निलेश भाऊसाहेब वाक्चौरे
(संपादक)

अल्पावधीत या आमच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्वतःच्या नावाचा एक वेगळा ठसा उमटविला. अशा आमच्या महत्वाकांक्षी महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ चे 'ब्रम्हानंद' हे वार्षिक नियतकालिक आपणाला सुपूर्त करताना आम्हांस विशेष अभिमान वाटतो. श्री ब्रम्हानंद स्वामींच्या पदस्पर्शाने दोडी गावचा परिसर पवित्र, मंगलमय, सुजलाम सुफलाम झाल्या कारणाने या नियतकालिकेला 'ब्रम्हानंद' नाव देण्यामागे शीर्षक समर्पकता आहे.

कोरोना महामारीच्या प्रदीर्घ कालखंडाचा शिक्षणक्षेत्रावर दुरगामी परिणाम झाले आहेत. पुन्हा एकदा नव्या उमेदीने जोमाने संपूर्ण जग पुर्वपदावर येत असताना असंख्य समस्यांना विद्यार्थी वर्गाला तोंड दयावे लागले अशा पार्श्वभूमीवर पुन्हा विद्यार्थ्यांच्या हाती असलेला मोबाईल काढून घेवून त्यांना लेखनीची हाती देवून नव तरुण वर्गाला लेखन करण्यास प्रवृत्त करण्यासाठी 'ब्रम्हानंद' हा एक छान उपक्रम नियमितपणे महाविद्यालयाचा वतीने मी राबवित आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःचे विचार, मन, भाव, भावना, प्राप्त ज्ञान उत्स्फुर्तपणे आपल्या लेखनीतून मांडण्याचा केलेला प्रयत्न तसेच महाविद्यालयातील विविध विभागांनी वर्षभर राबविलेल्या नानाविध नाविन्यपूर्ण उपक्रम व कार्यक्रमांची संक्षिप्त माहिती देण्याचा आमचा हा मनोदय आपणास निश्चितच भावेल.

या अंकात काही उणीव राहिली असेल ती संपादकाची आहे. जे उत्तम असेल ते संपादक मंडळ, सहकारी प्राध्यापकाचे, कर्मचारी, विद्यार्थी, मुद्रक यांच्या सामुहिक परिश्रमाचे यश असेल तसेच आपल्या केलेल्या सूचना व प्रतिक्रियांचे संपादक मंडळ दखल घेईल एवढे येथे नमूद करतो.

धन्यवाद !

*प्रा.निलेश भाऊसाहेब वाक्चौरे*
(मराठी विभाग प्रमुख)



## Our Vision :

Shri Brahmanand Swami Shikshan Prasarak Mandal's Arts and Commerce College is a premier institute of higher education with the vision statement "Vidya Vinayen Shobhate" Viz The Knowledge benifits with humility.

## Our Mission :

To provide education to socically and economically under privileged students of the society.

## Objectives :

1) To emerge as a centre of academic excellence.
2) To focus on to foster their knowledge information and understanding of their right things.
3) To make every student employable through holistic education and development of right skills.
4) To promote every students by several out reach projects and programmes.
5) To inculcate national the spirit of national integretion respect for our culture among our students and society at large respect.

# कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ||, ता.सिन्नर, जि.नाशिक

## ..विद्यमान संचालक मंडळ..

अध्यक्ष




मा.पांडुरंग गणपत केदार

उपाध्यक्ष



मा.कारभारी पंढरीनाथ आव्हाड

चिटणीस



मा.राजाराम देवराम आव्हाड

सहचिटणीस



मा.संपत कचरु शेळके

खजिनदार




मा.तुकाराम एकनाथ केदार

विश्वस्त



मा.रमेश रामभाऊ पाटील

विश्वस्त



मा.संजय महादेव कुलकर्णी

विश्वस्त



मा.निवृत्ती गणपत केदार

विश्वस्त



मा.किसन शंकर आव्हाड

विश्वस्त




मा.माधव निवृत्ती आव्हाड

विश्वस्त



मा.ज्ञानेश्वर शंकर आव्हाड

विश्वस्त




मा.कृष्णा शिवराम आव्हाड

विश्वस्त



मा.निलेश देवराम केदार

विश्वस्त



मा.श्री.रमेश आनंदा उगले

विश्वस्त



मा.श्री.अशोक बाळोबा सांगळे


# ..महाविद्यालय विकास समिती..

अध्यक्ष



मा.कारभारी पंढरीनाथ आव्हाड

सदस्य




मा.श्री.निवृत्ती गणपत केदार

सदस्य



मा.एकनाथ शिवराम आव्हाड

सदस्य



मा.ॲड.दत्तात्रय चिमाजी केदार

सदस्य



मा.चंद्रभान शिवाजी जाधव

माजी विद्यार्थी प्रतिनिधी



श्री.गणेश म्हाळु आव्हाड

प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा.विजय राजाराम कांगणे

प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा.राजेंद्र आनंदा केदार

प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा.प्रशांत सुर्यभान उगले

समन्वयक (गुणवत्ता हमी समिती)



प्रा.सोमेश्वर किरण बलक

प्राध्यापक प्रतिनिधी



प्रा.निलेश भाऊसाहेब वाकचौरे

प्रशासकिय सेवक प्रतिनिधी



श्री.रामदास बाजीराव आव्हाड

पदसिध्द सचिव



प्रा.संदिप भागुजी भाबड

# भावपूर्ण श्रध्दांजली !

सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात
संस्थेतील कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी,
हितचिंतक तसेच भारतातील शैक्षणिक,
सामाजिक, राजकीय, सहकार, कला,
क्रिडा, साहित्य, विज्ञान इत्यादी
क्षेत्रातील महाविद्यालयाशी संबंधित
ज्ञात अज्ञात व्यक्ती तसेच देशासाठी
लढणारे वीर जवान तसेच मृत्यूमुखी
पडलेले निरपराध नागरीक या सर्वांना
महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राचार्य,
प्राध्यापक वर्ग, प्राध्यापकेत्तर,
कर्मचारी व विद्यार्थी यांची

**विनम्र श्रध्दांजली...!!!!**

## ...अनुक्रमणिका...

...अनुक्रमणिका...

# ...मराठी विभाग...

## गद्य व पद्य विभाग

# जी. एस. टी. (G.S.T.) आदर्श कर प्रणाली




कु.सरला बाळू सांगळे (T.Y.B.Com.)

जी.एस.टी. (G.S.T.) म्हणजे हा असा एक कर आहे. जो कोणत्याही सेवेचा लाभ घेण्यासाठी रिटर्न्स मध्ये भरावा लागतो. जी.एस.टी. (G.S.T.) अंमलबजावणीच्या चार वर्षानंतरही, त्याबद्दल अनेक गोष्टी लोकांना समजत नाही.

बरेच लोक आजही जी.एस.टी. (G.S.T.) म्हणजे काय? जी.एस.टी. (G.S.T.) चा फुल फॉर्म काय? असे बेसिक प्रश्न विचारताना दिसतात.

अशा सर्व लोकांच्या समस्या लक्षात घेऊन आपण हा लेख तयार करत आहोत.

जी.एस.टी. (G.S.T.) चा फुल फॉर्म (Goods and Service Tax) असा आहे. मराठीमध्ये जीएसटी (G.S.T.) चा अर्थ-वस्तु आणि सेवा कर. जी.एस.टी. (G.S.T.) हा कर कोणतेही वस्तु खरेदी करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारची सेवा वापरण्यासाठी दयावा लागतो.

पुर्वी अस्तित्वात असलेले अनेक प्रकारचे कर जसे की, Excise Duty, VAT, Entry Tax, Service Tax इ.काढून टाकुन हा जी.एस.टी. (G.S.T.) कर त्याच्या जागी आणला गेला.

भारतात १ जुलै २०१७ पासुन त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

**■ जी.एस.टी. (G.S.T.) पुर्वीच्या करप्रणालित काय दोष होता.**

**What Was Worng With the Old Tax System ?**

जी.एस.टी. (G.S.T.) आधीच्या करप्रणाली मध्ये असा दोष होता कि त्यात टॅक्स वर टॅक्स भरले जात होते. समजा तुम्हाला नाशिकच्या शालीमार येथुन एक ड्रेस घ्यायचा आहे. समजा झारा कंपनी हे ड्रेस तयार करते. त्यामुळे ती कुठून तरी कच्चा माल खरेदी करेल तो माल खरेदी करण्यासाठी ती कंपनी कर भरेल मग ती कच्चा मालापासून कारखान्यात ड्रेस बनवेल त्यावरही कर भराव लागेल. जर तुम्ही विकेल तर त्यावर कर देखील भराल जर खरेदी दाराने तो इतरत्र विकला तर तो सर्व कर एकत्र करुन नवीन किंमत बनवेल आणि त्यावर कर भरेल.

**■ जी.एस.टी. (G.S.T.) का लागू करावा लागला.**

भारतीय संविधानात कराशी संबंधित जुन्या नियमांमध्ये केंद्र सरकारला वस्तु आणि सेवांच्या उत्पादन/ निर्मितीवर कर लावण्याचा आधिकार होता.

**■ जी.एस.टी. (G.S.T.) चे दर/वस्तु आणि सेवा करांचे दर**

जीवनावश्यक वस्तुंवर किमान कर आणि लक्झरी आणि कमी महत्वाच्या जास्तीत जास्त कर लावून जीएसटी (G.S.T.) अधिकाधिक चांगला बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.




**■ वस्तु आणि सेवा करांचे दर :**

▮ 0.0 % G.S.T. : जीवनावश्य वस्तु आणि सेवांवर; जसे धान्य, मीठ, गुळ, ताज्या भाज्या इ.

▮ 0.5 % G.S.T. : सामान्य वस्तु आणि सेवांवर जसे की साखर, तेल, मसाले, चहा, कॉफी खते इ.

▮ 12 % G.S.T. : दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या वस्तु आणि सेवांवर, जसे स्नॅक्स टुथपेस्ट, छत्री, औषधे इ.

▮ 18 % G.S.T. : मध्यम जीवनशैली जगणाऱ्या लोकांनी वापरल्या वस्तु जसे डिटर्जंट चॉकलेट, मिनरल वॉटर आईस्क्रीम, शांपु इ.

■ 28 % G.S.T. : लक्झरी आणि हानिकारक श्रेणीत येणाऱ्या वस्तु आणि सेवांवर जसे की पानमसाला, ऑटोमोबाईल पंचतारांकित हॉटेलमध्ये निवास इ.

■ **G.S.T. चे प्रकार :**

■ सी.जी.एस.टी. (C.G.S.T.) म्हणजे Central Good & Service Tax जिथे केंद्र सरकारकडून महसुल गोळा केला जातो.

■ एस.जी.एस.टी. (S.G.S.T.) State Goods & Service Tax राज्य सरकारांकडून राज्यांतर्गत महसुल गोळा केला जाईल.

■ आय.जी.एस.टी. (I.G.S.T.) म्हणजे Integrated Good & Service Tax जिथे केंद्र सरकारद्वारे विक्रीसाठी महसुल गोळा केला जाईल.

❑❑❑❑

## एका सुंदर नात्यावर (संकलन)




कु.उगले हेमा सोमनाथ (T.Y. B.Com.)

मैत्री एक सोपी व्याख्या आहे
रोज आठवण यादी असं काही नाही
रोज भेट व्हावी असं काही नाही
एवढंच कशाला रोज बोलणं व्हावं
असंही काहीच नाही ;
पण मी तुला विसरणार नाही
ही झाली खात्री आणि
तुला याची जाणीव असणं ही
झाली मैत्री
शेवटी काय हो भेट नाही झाल्या तरी गाठी
बसणं महत्वाचं ज्यांनी हे जाणलं त्यांनी
माणसातलं माणूसपण जाणलं....

❑❑❑❑

## आयुष्य...



कु.उगले हेमा सोमनाथ (T.Y. B.Com.)

आयुष्य असंच जगावं लागतं
कधी हसावं तर कधी रडावं लागतं
पण आयुष्य मात्र असंच जगावं लागतं
कधी सुख तर कधी दुःख अनुभवावं लागतं
पण आयुष्य मात्र असंच जगावं लागतं
कधी तारीफ तर कधी बोलणी ऐकावं लागतं
पण आयुष्य मात्र असंच जगावं लागतं
कधी हसावं तर कधी रडावं लागतं
पण आयुष्य मात्र असंच जगावं लागतं
कुणाचे प्रेम तर कुणाचा तिरस्कार
सहन करावा लागतो
पण आयुष्य मात्र असचं जगावं लागतं
आयुष्य हे विधात्याच्या वहीतील पान असतं
रिकाम तर रिकामं, लिहिलं तर छान असतं.
शेवटचं पान मृत्यू अन् पहिलं पान जन्म असतं
मधली पाने आपणच भरायची, कारण
ते आपलंच कर्म असतं.
होणाऱ्या चुकांना टाळायचं असतं
कुठलच पान कधी गाळायच नसतं
चूक झाली तरी फाडून फेकायचं नसतं
कारण त्यातूनच आपल्याला
पुढे शिकायचं असतं.
नाती जपण्यात मजा आहे
बंध आयुष्याचे विणण्यात मजा आहे
जुळलेले सुर गाण्यात मजा आहे
येतांना एकटे असलो तरी सर्वांचे होऊन जाण्यात मजा आहे
नशीब कोणी दुसरं लिहित नसतं
आपल नशीब आपल्याच हाती असतं
येतांना काही आणायचं नसतं
जातांना काही न्यायचं नसतं
मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असतं
याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जन्माला
यायचं असतं.

❑❑❑❑

# जी. एस. टी. (G.S.T.) एक सेवा कर




कु.मयुर रविंद्र भालेराव (T. Y. B.Com.)

(GST) जी.एस.टी. हा आपल्या आता रोजच्या वापरातील शब्द झाला आहे. त्याच्या बातम्या आपल्या कानावर सतत पडत असतात. जी.एस.टी अंमलात आणणे हे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मोठे पाऊल ठरले आहे. (GST) जी.एस.टी. म्हणजे नेमक काय हा आपल्या सर्वांसाठी पडलेला प्रश्न आहे. चला तर जाणून घेऊ या आपण सोप्या भाषेत थोडक्यात (GST) जी.एस.टी. म्हणजे काय?

(GST) जी.एस.टी. म्हणजे Good and Services Tax म्हणजेच मराठी मध्ये वस्तु सेवा कर.

१ जुलै २०१७ रोजी आपल्या भारतात (GST) जी.एस.टी. लागू करण्यात आला. लागू केल्यावर बाकीचे सर्व कर हटवण्यात आले. जसे की V.A.T.सेवा कर इत्यादी.

(GST) जी.एस.टी. संबधित निर्णय देणारी एक विशेष (GST) जी.एस.टी. परिषद आहे. तिथे सध्या चार Slabs आहे. 65%, 12%, 18%, 28% कोणत्या वस्तूसाठी अथवा सेवेसाठी किती टॅक्स असावा तो निर्णय हि परिषद घेते. जसा आपल्या मोबाईल नंबर असतो तसा (GST) जी.एस.टी. नंबर असतो. (GST) जी.एस.टी. नंबर हा पंधरा अंकी असतो. कोणत्याही बिलावर (GST) जी.एस.टी. नंबर असल्यावर तो लगेच दिसून येतो.

**■ (GST) जी. एस. टी. नंबरची कोणाला गरज असते ?**

▮ जे व्यवसाय करण्याकडे पूर्वी Vat, Excise, Service Tax Certificate होते. त्यांना (GST) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन बंधनकारक करण्यात आले.

▮ ई-कॉमर्स व्यवसाय, उत्पादक, सेवा पुरवठादार, वितरक यांना सुध्दा (GST) जी.एस.टी. सेवा कर Compulsary करण्यात आले.

▮ (GST) जी.एस.टी. नंबर साठी आपल्या व्यवसायाची उलाढाल ४० लाकापेक्षा जास्त हवी.

▮ चाळीस लाखाच्या आतील वार्षिक उलाढाल असणाऱ्या तसेच नुकतीच व्यवसायांची सुरुवात करणाऱ्यांना हे रजिस्ट्रेशन ऐच्छिक आहे.

**■ (GST) जी.एस.टी. नोंदणीसाठी लागणारे कागदपत्रे :**

▮ (GST) जी.एस.टी. नोंदणी फॉर्म भरण्यास सोबत अर्जदाराचे आधार कार्ड आणि पॅन कार्डची कॉफी आवश्यक असते.

▮ Incorporation Certificate and Business Registration Proof फोटोसह Promotor Or Director ची Identity and Adress Proof यामध्ये तुम्ही Driving Licenses, Voter ID, Bank Passbook Copy वापरु शकता.




▮ Business Address Proof यात Copy of Elearicity Bill and Rent Agreement Index - II Copy लागेल.

▮ बँक अकाऊंट स्टेटमेंट किंवा कॅन्सल चेक.

▮ डिजिटल स्वाक्षरी.

**■ (GST) जी.एस.टी. नोंदणी चे काय फायदे आहेत ?**

▮ (GST) जी.एस.टी. त्यामुळे तुम्हास वस्तु किंवा सेवा पुरवठादार म्हणून लिगली ओळख मिळते.

▮ वस्तु विकत घेणाऱ्याकडून आपण अधिकृतपणे टॅक्स कलेक्ट करु शकता आणि वस्तु विकत घेणाऱ्यास पास करु शकतात.

■ नियमितपणे आणि वेळेवर (GST) जी.एस.टी. भरणाऱ्यांना बरेच बँका (GST) जी.एस.टी. O.D. लोन सुविधा देतात. त्याचा फायदा घेण्यासाठी व्यावसायिकांनी आपल्या बँकेत संपर्क करावा.

■ (GST) जी.एस.टी. Tax मुळे Indirect Tax मधुन आपली सुटका झाली आहे.

■ (GST) जी.एस.टी. या प्रकियामुळे पारदर्शकता निर्माण झाली आहे.

■ Service Tax आणि VAT Tax एकत्रित झाल्यामुळे हे सर्व टॅक्स कंपालयन प्रोसेस (Compilation Process) खुप सोप झालेल आहे.

■ (GST) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन आपण स्वत: (GST) जी.एस.टी. पोर्टल वर जाऊन करु शकतो अथवा यासाठी Company Secretary किंवा CA ची मदत घेऊ शकतो.

❑❑❑❑

## जीवन



कु.योगिनी डावरे (S.Y.B.A.)

ओढ म्हणजे काय ते  
जीव लावल्याशिवाय समजत नाही...  
विरह म्हणजे काय ते  
प्रेमात पडल्याशिवाय समजत नाही..  
प्रेम म्हणजे काय ते  
स्वत: केल्याशिवाय समजत नाही....  
पराजय म्हणजे काय ते  
शत्रूकडून हारल्याशिवाय समजत नाही  
दु:ख म्हणजे काय ते  
अपेक्षाभंग झाल्याशिवाय समजत नाही....  
सुख म्हणजे काय ते  
स्वत: मध्ये शोधल्या शिवाय मिळत नाही...

❑❑❑❑

## नि:शब्द




कु.योगिनी डावरे (S.Y.B.A.)

निरामय होतात मनीच्या भावना  
जेव्हा नि:शब्द होतात शब्द तेव्हा ।। १ ।।

का कुणास ठाऊक आकस्मात  
येते जीवनात वादळ  
अपराधविणा होतो सजा  
निशब्द होता शब्द तेव्हा ।। २ ।।

भावना मनीच्या ओठी न येती,  
अपराध काय माझा,  
मी मागे सावली माझ्या पुढती  
तु एक स्त्री घे पाऊल मागे सांगे जग जेव्हा,  
नि:शब्द होतात शब्द तेंव्हा ।। ३ ।।

शब्द एक भाषा शब्द एक भावना,  
झेलुन बिजली परी चमकावे,  
शब्द फुलताना काळोख  
दातुन येतो ढगांचा जेव्हा,  
नि:शब्द होतात शब्द तेव्हा ।। ४ ।।

शब्दच देतात शब्दांना उभारी  
श्रावणात जसा कोसळती मेघसरी  
न नाते न गोते शब्द होतात  
शब्दांना आचार जेव्हा  
नि:शब्द होतात शब्द तेव्हा ।। ५ ।।

❑❑❑❑



दि.१४ एप्रिल २०२२ रोजी विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले (११ एप्रिल) व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल) संयुक्तपणे साजरी करताना प्रा.डॉ.नंदकिशोर ब्राह्मणे,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रशांत उगले, प्रा.डॉ.श्रीमती शेख निलोफर, प्रा.अरुण आव्हाड, प्रा.सोमनाथ आव्हाड, प्रा.बाबासाहेब कासार, प्रा.सोमेश्वर बलक, प्रा.राजेंद्र केदार, प्रा.श्रीमती कल्पना घुगे व इतर प्राध्यापक वृंद




शुक्रवार, दि.३ जुन २०२२ रोजी महाविद्यालयात युवा महोत्सव अंतर्गत विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी टाय डे व साडी डे प्रसंगी विद्यार्थी वर्ग समवेत प्राध्यापक वृंद



शुक्रवार, दि.३ जुन २०२२ रोजी महाविद्यालयात युवा महोत्सव अंतर्गत काव्यवाचन व गीतगायन स्पर्धेत कविता वाचन करताना विद्यार्थीनी कु.गायत्री बोडके व व्यासपीठावर उपस्थित परीक्षक, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.एस्. बी. भाबड, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा.एन्. बी. वाकचौरे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.डॉ.श्रीमती एन्. ए. शेख व समवेत व्यासपीठावरील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित विद्यार्थी




गुरुवार, दि.१० मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने 'जागतिक महिला दिन' व 'सावित्रीबाई फुले स्मृतिदिन' निमित्ताने आरोग्यविषयक जनजागृतीपर व्याख्यानमाला प्रसंगी 'महिलांचे आरोग्य व त्वचारोग' या विषयावर व्याख्यान देताना मा.डॉ.मनिषा आव्हाड-आंधळे, प्रसंगी व्यासपीठावर मा.डॉ.रोहिणी आव्हाड-नागरगोजे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.डॉ.श्रीमती निलोफर शेख, प्रा.सुषमा सगर, प्रा.कल्पना घुगे आदी मान्यवर व उपस्थित विद्यार्थीनी

# कला व वाणिज्य महाविद्यालय, दोडी बु ॥, ता.सिन्नर, जि.नाशिक



सोमवार दि.२८ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठी विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी राजभाषा गौरव दिन' प्रसंगी व्याख्यान देताना शिवव्याख्याते मा.श्री.राजाराम नारायण आव्हाड, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.विजय कांगणे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.डॉ.श्रीमती निलोफर शेख, प्रा.डॉ.नंदकिशोर ब्राम्हणे, प्रा.बाबासाहेब कासार, प्रा.अरुण आव्हाड व उपस्थित विद्यार्थी




गुरुवार दि.१० मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक महिला दिन' व 'सावित्रीबाई फुले स्मृतिदिन' निमित्ताने आरोग्यविषयक जनजागृतीपर व्याख्यानमाला प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रभारी प्राचार्य प्रा.एस. बी. भाबड, व्यासपीठावर व्याख्यात्या तज्ज्ञ मा.डॉ.रोहिणी आव्हाड-नागरगोजे व त्वचारोग तज्ज्ञ मा.डॉ.मनिषा आव्हाड-आंधळे, विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा.निलेश वाकचौरे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.डॉ.श्रीमती निलोफर शेख, प्रा.कल्पना घुगे, प्रा.सुषमा सगर व उपस्थित विद्यार्थीनी




दि.११ फेब्रुवारी २०२२ रोजी महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर मार्गदर्शन उपक्रम 'करिअर कट्टा' चे उद्घाटन करताना प्रभारी प्राचार्य एस. बी. भाबड, 'करिअर कट्टा' चे समन्वयक प्रा.सोमनाथ आव्हाड, प्रा.डॉ.नंदकिशोर ब्राह्मणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रशांत उगले, प्रा.डॉ.श्रीमती निलोफर शेख, प्रा.अरुण आव्हाड, प्रा.बाबासाहेब कासार, प्रा.सोमेश्वर बलक, प्रा.राजेंद्र केदार, प्रा.श्रीमती कल्पना घुगे व उपस्थित विद्यार्थी



राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबीर मौजे - खंबाळे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वयंसेवक प्रभात समयी कवायत व योगाचे प्रात्यक्षिके करताना

## मोकळा श्वास




कु.शिवम डावरे (T.Y.B.A.)

मुलगी म्हणून जगताना, पडतात काही प्रश्न...
सापडत नाहीत उत्तरे, म्हणून कठीण झालय जीणं....
अरे तुम्हीच केलय तीच्या जगण्याच कोडं
कोणी दिला होता अधिकार तुम्हाला,
ती कोवळी-कळी खुडण्याचा बाहेरचे
जगण्या आधीच तिला आंधळे करण्याचा?
अरे लक्षात ठेवा मर्दांनो,
शिवबाला घडवणारी पण एक स्त्रीच होती...
तुम्हीतर म्हणता स्वत:ला शिवभक्त पण
मग कुठे गेली स्त्रीविषयीची तुमच्या डोळ्यातील इज्जत?
का आनताय आमच्यावर चेहरा लपवण्याची ही वेळ?
भाग्य माझे आज म्हणून आईबाबांनी आयुष्यात
उभे रहायला शिकविले
पण त्याच बाबांचा आज
काळजीपोटी जीव गुदमरतोय हो...
जीव गुदमरतोय....
कोणी दिलाय अधिकार तुम्हाला
आमच्या जीवाशी खेळण्याचा??
अरे बाबांची लाडकी असते एक मुलगी...
परी म्हणून आईजवळ रडून मन
मोकळे करणारी असते मुलगी...
बाबांचे अंगण सोडून दुसऱ्यांच्या
अंगातील बाग फुलवते मुलगी...
बायको बनून कोणतीही तक्रार
न करता साथ देते ती मुलगी...
आई बनुन स्वत:चे आजारपण
बाजुला ठेऊन झटते ती मुलगी...
एकाच जन्मी सार काही असते ही मुलगी
मग होऊ दे आज तिला सुटकेचा
मोकळा श्वास

❑❑❑❑

## कॉलेज



कु.मयुर रविंद्र भालेराव (T.Y.B.Com.)

मित्रांसोबत कट्ट्यावर बसून थट्टा करता करता.
भविष्याच्या वाटचालीना जिथून सुरुवात होते
ते ठिकाण म्हणजे कॉलेज...

एखाद्या प्राध्यापकाने पाठीवर कौतुकाची
थाप मारल्यावर जीवनात यशस्वी होऊन
दाखवण्याची उर्जा जिथून मिळते
ते ठिकाण म्हणजे कॉलेज...

आवडत्या व्यक्तीने नाकारल्यावर,
प्राध्यापकांनी केलेल्या अपमानावर
स्वत:ला जीवनात सिध्द करण्यासाठी
केली जाणारी धडपड, ती धडपड
करण्याची जिथून मनाला आग लागते
ते ठिकाण म्हणजे कॉलेज...


कॅन्टींग चे बील भरण्यासाठी मित्रांसोबत
झालेले कलह आयुष्यभर लक्षात राहतात
ते ठिकाण म्हणजे कॉलेज....

आयुष्यभरासाठी एक रम्य
अशी आठवण मनात कायम
घरात मन करुन राहते
ते ठिकाण म्हणजे कॉलेज...

जीवनात प्रत्येक सुख:दुखात
साथ देणारे जीवा भावाचे
मित्र मैत्रीणी जिथे भेटतात
ते ठिकाण म्हणजे कॉलेज....

❑❑❑❑

# ती....



संकलन : कु.महेश बैरागी (S.Y.B.A)

- येता जाता दिसताच करायचो मी तिचे – Observation
- करुन यायची ती रोज वेगवेगळी – Fashion
- दिवसेंदिवस वाढत गेले तिच्या बद्दल – Attractin
- वाटायचे की ही आहे माझ्यातली एक – Fraction
- म्हणून मी तिचेच केले – Selection
- मणात नेहमी चालायचे बिचारांचे – Calculation
- त्यामूळे सतत मात्र वायचे – Tension
- घरच्यांची मात्र यावर – Reaction
- काहीतरी घ्यायला हवी – Action
- मित्रांबरोबर केले यावर – Discussion
- त्यांनी दिले मला – Suggestion
- मग मी पाडायला लागलो तिच्यावर – Imperssion
- सगळ्यांनी दिले मला – Congratulation
- मी म्हणताच थॅंक्यु, ती म्हणाली – No-Mention
- त्यावेळी चेहऱ्यावर तिच्या पाहण्यासारखे होते – Expression
- तिथेच झाले दोन हृदयांचे – Connection
- तेव्हापासून निर्माण झाले – Relation
- घरच्यांकडून मिळाली – Permission
- त्या आनंद प्रीत्यार्थ आहे आजचे हे – Function
- म्हणून सर्वांना दिले आहे. – Invitation
- ती तर आहे माझी प्रिय – Hero Honda Ambition

❑❑❑❑

# भारत देश समस्यांचा की संधीचा

कु.सांगळे दिपक ज्ञानेश्वर (T.Y. B.Com.)

जगातील सर्वात जुनी संस्कृती आणि तरुण देश असणारा भारत देश काही वर्षातच विश्वशक्ती बनेल यात काही संशय नाही. परंतु या गोष्टीत काही दुमत नसावं. वाढती लोकसंख्या, वाढते वायु प्रदुषण, कधी ओला तर कधी सुका दुष्काळ, महामारी, कुपोषण, गरिबी, मानवी आरोग्य, स्वास्थ्य, सेवांची अपूर्तता आणि झगमग करणारी अर्थव्यवस्था, समस्या असंख्य आहे. ही शोकांतिकेची गोष्ट अशी आहे की सामाजिक संस्था आणि देशातील तरुणाई मात्र सर्व समस्याचं समाधान सरकारकडून अपेक्षित धरत अणि सरकारच ते काम आहे. परंतु मग देशातील नागरिकांची ही आपल्या देशाप्रती काही जबाबदारी असावी.

अशा परिस्थित प्रश्न हा पडतो की, देशातील युवा काय करत आहे? तो कुठे चौकात बसुन टपालक्या तर नसेन करत. सिगारेटच्या धुऱ्यात स्वत: आयुष्य खाक तर करत नसेल ना? या सुंदर जीवनाला दारुच्या बाटलीत तर उतरवत नसेल या विचारांनी मन अगदी होरपळून निघत. उपरोक्त समस्यांना असा देश कसा उत्तर देईल? जो स्वत: व्यसनांच्या बेडीत अडकलेला असेल. समस्या अनेक आहे मात्र गरज आहे या समस्यांना संधीत बदल करण्याची. युवकांना नवनवीन संभावना शोधण्याची गरज आहे अशा दृष्टीकोनाची जो या संभावनाना पुढे आणेल.

जी परिस्थिती देशातील युवकांची तिला बदलण्याचे काम शिक्षण व्यवस्थांचे आहे परंतु शिक्षण संस्था सध्या व्यापारी संस्थानात बदलत चालल्या आहे. शिक्षक आणि विद्यार्थांचा संवाद आणि संपर्क कमी होत आहे. आणि जरी शिक्षण व्यवस्थेत सुधार झाले तरी ते सुधार विद्यार्थ्याच्या जीवनावर किती प्रभावी आहे या गोष्टीत अस्पष्टता आहे. गुणपत्रकावर साखिकिय स्वरुपात जर वाढ होत असली. परंतु कौशल्य विकासाचा आलेख निरंतर ढसळत चालला ओ. शिक्षण व्यवस्था विद्यार्थ्यांच्या रचनात्मकतेला आणि कला विशिष्ट गुणांना मंच देण्यात अपुऱ्या पडत आहे. शैक्षणिक आणि सामाजिक संस्थान भौतिकवादी व्यक्ती निर्माण करु शकतात परंतु आदर्श चरित्रांची निर्मितीची आशा करणे असंभव आहे.



अशा परिस्थितीत काही अशा व्यक्तीची गरज आहे. ज्यांनी समस्यांना साधनांना मध्ये परावर्तीत करुन क्रांती घडवून आणली. उदा.छत्रपती शिवाजी महाराज ज्यावेळेस छत्रपतींनी घृष्णेश्वराच्या मंदिरात स्वराज्याची शपथ घेतली त्यावेळेस १६ वर्षाच्या युवकापुढे/कुमार राजकिय, भौगोलिक सेना आणि आर्थिक समस्यांचे स्वरुप आणि घनता काय असेल याची कल्पना संभवत: तुम्ही आम्ही करु शकतो. दरीखोऱ्यांची महाराष्ट्र भूमी, दिल्लीच्या गादीवर बसले ते अमानुष सत्ताधारी आर्थिक दुर्लबता आणि मानसिक स्वरुपाने गुलाम झालेली जनता आणि या समस्यांना छत्रपतींनी स्वराज्यांची निर्मिती ती केली या सर्वांना साधनामध्ये परिवर्तीत केली आणि मुघलांना महाराष्ट्राच्या धरतीवर सळो की पळो केले. ते ही युवा होते परंतु फरक/बदल मात्र दृष्टीकोनामध्ये होता. त्यांनी समस्यांना साधनामध्ये परिवर्तीत केले आणि नवीन संभावनाना शोधले. तरुणाकडे आजही संधी आहे समस्या नव्हे की नाही फक्त गरज युवा क्रांतीची जिने वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये अपेक्षित आणि अपेक्षित असे परिणाम प्राप्त केले जाऊ शकतात.

■ **कृषी क्षेत्रात सकारात्मक संभावना :**

यात काही दुमत नाही की, भारतीय कृषी वेगवेगळ्या आव्हान आणि समस्यांनी भरलेली परिस्थिती असंतोष जनक आहे. कधी ओला तर कधी सुका दुष्काळ, रोगराई आणि वाढत तापमान. परंतु भारतीय कृषी क्षेत्र सातत्याने प्रगती पथावर अग्रेसर आहे. मोठ्या प्रमाण खाद्यान्नाची निर्मिती हरितक्रांती पासुन वाढत आहे.

लोकांना शेती हा विषय सध्या तिरस्काराचा होत चालला, लोक अगदी नाती जुळवताना किती? शेती आणि बागायती कि जिरायती? भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात जरी आव्हानं असली तरी सध्या हवामान, बाजारपेठेचा अंदाज, उत्पनाची गुणवता व प्रकार मालाची मागणी आणि उपयोगिता या गोष्टीवर विचारात घेऊन केलेली शेती शेतकऱ्यासाठी संजीवनी आणि खऱ्या अर्थाने लक्ष्मी आहे.

शेतीत नव्याने आलेली एक संकल्पना म्हणजे समुह शेती. एका पेक्षा अधिक व्यक्ती / मित्र / तरुणांनी एकत्रितपणे केलेली उत्पन्न व्यापारी मालाच्या शेतीला समूह शेती म्हणतात. यात उत्पन्नाची समुहातील सदस्यांनी त्यांच्या भूभागावर मालाचे उत्पन्न घेऊन प्रत्यक्षपणे औद्योगिक कंपनीशी व्यवहार करता येऊन भरघोस उत्पन्न मिळवता येऊ शकते. त्याचबरोबर दुग्ध उत्पादन / शेळीपालन / कुक्कुटपालन / गोपालन इत्यादी जोडव्यवसाय शेतीला फायदेशीर बनवू शकता.

प्रयत्न करणाऱ्यासाठी वर्तमान वेगवेगळ्या सभावनांनी भरलेले आहे. क्षेत्र कोणतेही असो नियोजन आणि नेतृत्त्व क्षमता परिपूर्ण असलेले युवा त्यात अपेक्षित यश मिळवू शकता गरज आहे संभावना शोधण्याची आणि त्यांना प्रत्यक्षपणे कृतीत उतरवण्याची प्रासंगिक बनविण्याची.

❑❑❑❑

## महाराष्ट्रीयन खाद्य संस्कृतीतील वडापावचा इतिहास...



**संकलन : कु.सागर तेलुरे (S.Y. B.A.)**

आपण सकाळ-संध्याकाळी पोटाची भूक भागवण्यासाठी वडापाव खातो. अगदी स्वस्तात मिळणारे हे अन्न आणि चालता पळता ते खाऊ शकतो. यामुळे वडापाव खुप प्रसिध्द आहे. पण या वडापावचा शोध कोणी लावला? याचा कधी विचार केला आहे का? माहिती सेवा टिम आपणशस वडापावचा ज्यांनी शोध लावला त्या कमलाबाई ओगले यांची ओळख करुन देत आहे. १९६५-७० चा तो काळ होता, कमलाबाई मुंबईतील दादर येथे राहत होत्या, उन्हाळ्याचे दिवस होते, पाव्हुणे घरी आले म्हणून त्यांनी स्वयंपाक केला होता. बटाट्याची सुकी भाजी, भजे पुरणपोळी वगैरे... स्वयंपाक करताना त्यांनी बटाट्याची सुकी भाजी भज्याच्या पिठात टाकून तेलात सोडली, तर एक वेगळाच पदार्थ तयार झाला. त्यांनी तो पदार्थ खाऊन बघितला तर अगदी खमंग लागला. त्यांनी त्याला वडा हे नाव दिले.

नविन पदार्थ असल्यामुळे त्यांनी ता लोकांना खाण्यासाठी उपलब्ध करुन द्यायच्या हेतून घरापुढेच विकण्यास मांडला. जेव्हा लेक येऊन खाऊ लागले तर लोकांनाही खुप आवडला, पुढे पुढे हॉटिलवाल्यांनी त्यांची ही कल्पना चोरली आणि त्यांच्या नावाने मुंबईत वडे विकू लागले. त्या सोबत सुरवातीला चपाती देत असत, धावपळीच्या मुंबई मधे चपाती सोबत कशी न्यावी म्हणून चहासोबतच्या पावासोबत वडा विकला जाऊ लागला. त्याची कलाकृती चोरली हे पाहील्यानंतर त्यांनी रुचिरा चा विक्रम कोणी मोडू शकले नाही. अशा या आजीचा वयाच्या ८६ व्या वर्षी १९९९ साली पुण्यात निधन झाले. आज या आजीबद्दल कोणाला माहीत नाही म्हणून तुम्हास ओळख करुन देत आहे.

❑❑❑❑

# पदव्या आहेत; पण क्षमता आणि कौशल्यांचे काय ?



- श्री.संदिप वाकचौरे

संकलन : कु.सौरभ भालेराव (S.Y.B.A)

आपल्या शिक्षण व्यवस्थेचा विस्तार प्रचंड मोठा झाला आहे. सरकारच्या वतीने प्रत्येकाला शिक्षण मिळावे म्हणून घरापर्यंत शाळा पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे; मात्र या प्रयत्नानंतरही शंभर टक्के समूहापर्यंत शिक्षण पोहचले नाही. ज्या लोकांपर्यंत शिक्षण पोहचविण्याचा प्रयत्न झाला आहे, तया प्रयत्नाचा निश्चित अभिमान असायला हवाच. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षात आपल्या देशात केवळ सव्वीस टक्के लोक उच्च शिक्षणात सहभागी आहेत. आपल्याला येत्या काही वर्षात ते प्रमाण पन्नास टक्क्यापर्यंत पोहचविण्याचे उद्दिष्ट राष्ट्रीय शिक्षण धोरणात राखण्यात आले आहे. हे सव्वीस टक्के लोकांनी तरी खरचं शिक्षणाने अपेक्षित केलेल्या सर्व क्षमता आणि उद्दिष्टांची साध्यता केली आहे का? त्याचे उत्तर नाहीच असे आहे. आपल्याकडे पदव्या मिळाल्या; मात्र त्या पदव्यांची सार्थकता मात्र नाही. विनोबा म्हणतात की, आपल्याकडील ज्या पदव्या आहेत त्यातील बहुतांश पदवीप्राप्त लोक केवळ विद्या स्नातक स्वरुपातील आहे. आपल्या हाती पदव्या आहे; पण त्या पदव्यांची कौशल्य हाती नाही हे तर आपल्याकडील विविध सर्वेक्षणात सातत्याने समोर आले आहे. त्यामुळे विनोबा म्हणतात, की शिक्षणातून आपल्याला केवळ विद्या स्नातक नको, तर आपल्याला व्रत स्नातकांची अधिक गरज आहे. दुर्दैवाने विनोबांनी सूचवलेली शिक्षणाची वाट चालणे आपल्या मार्क्सवादी शिक्षणाला काहीसे कठीण आहे. पालकांना देखील मुलांच्या हाती पदव्या हव्या आहेत. आपल्या पाल्यांच्या हाती कौशल्य नसले तरी चालेल. कारण स्पर्धा तर कौशल्य, ज्ञानाऐवजी केवळ मार्कांची आहे. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाने किती परिणाम झाला हे कोणा मोजावे वाटत नाही आणि ते परिणाम मोजण्याची तशी कोणतीही व्यवस्थाही निर्माण करण्यात आपल्याला यश आलेले नाही. आपल्या समाज व शिक्षण व्यवस्थेला ती गरज वाटली नाही. त्यामुळे विनोबा म्हणतात की, विद्या स्नातक बरोबर व्रत स्नातक झाल्याशिवाय शिक्षणाचा परिणाम आपल्या जीवनात दिसणार नाही.

आपल्याकडे विविध विषयांची पदवी धारण करणारी अनेक मंडळी आहेत. अगदी हेच पाहना, कृषी पदवीधर होणारे विद्यार्थी किती प्रमाणात शेती क्षेत्रात काम करतात? ते कृषी पदवी घेतात; मात्र त्यांना तर त्या पदवीच्या आधारे शेतीपेक्षा इतर क्षेत्रांत अधिक उत्तम दर्जाची नोकरी हवी असते. कृषी पदवी तर शेतीच्या विकासासाठीचे ज्ञान देते आणि हे मुले शेतीऐवजी नोकरी पसंत करतात. आपल्याकडे शेतीला प्रतिष्ठा नाही. कष्टाला कुठेच प्रतिष्ठा नसल्याने लोक कष्टापेक्षा कष्टाशिवाय जी कामे होतील ती करण्यात रस दाखवतात. आपण शिक्षण ज्या विषयाचे घेतो त्या विषयाचे मान त्या त्या क्षेत्रात उपयोजन करण्याची क्षमता निर्माण करण्याची गरज आहे. अनेकदा आपल्याकडे शिक्षण आणि नोकरी, शिक्षण आणि व्यवसाय याचा तसा फारसा संबंध नाही. परवा आपल्या राज्यात पोलीस भरतीच्या प्रक्रियेत अगदी शिपाई पदासाठीच्या रांगेत उभ्या राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या पदव्या पाहिल्या, तर या पदव्यांची त्या पदासाठी खरच गरज आहे का? असा प्रश्न पडतो. पोलीस शिपाई होण्यासाठी दहावी, बारावीचे शिक्षण पुरेसे होते. मात्र रांगेत कोणी पी.एचडी होते, कोणी वैद्यकिय पदवी धारण केलेली होती, कोणी विविध विषयाचे पदवीदर, कोणी विधी, कोणी कृषी अशा अनेक विषयांचे पदवीधारक विद्यार्थी यात सहभागी झाले होते. हे चित्र आपल्या शिक्षणातील ज्ञानावरती प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. केवळ विषयांच्या पदव्या धारण केल्या आहेत. त्या विषयाचे सखोल ज्ञानाची साधना केली गेली असती तर हे विद्यार्थी देशासाठी त्या त्या क्षेत्रात लागणारे उत्तम गुणवत्तेचे अधिक चांगले मनुष्यबळ मिळाले असते. यात त्या विद्यार्थ्यांचा दोष नाही.

विद्यार्थ्यांची अभिरुची, कल लक्षात घेऊन त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून लि असती, तर मुलांना आपले क्षेत्र सोडून इतर क्षेत्रात जावे लागले नसते. कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही विषयाचे पदवीधर उमेदवार उभे राहतात. याचे कारण आपल्या शिक्षणात केवळ विद्या स्नातक म्हणनू पदवीप्राप्त करणारे उमेदवारांची संख्या अधिक आहे. आपण शिक्षणातून जेव्हा विद्या स्नातक निर्माण करतो, तेव्हा ते केवळ माहितीने युक्त आहेत. माहितीने कोणाच्याही जीवनात परिवर्तन होत नाही. माहितीचा संबंध मार्कांशी आहे. मार्कांचा संबंध हुशारीशी आहे; मात्र व्रताचा संबंध हा ज्ञानाशी आहे. ज्ञानाचा संबंध हा शहाणपणाशी आहे. शहाणपणाचा संबंध हा नेहमीच परिवर्तनाशी आहे. त्यामुळे ज्ञान हवे तर व्रताची वाट चालावीच लागेल. त्यामुळे शिक्षणाची वाट चालायची असेल, तर त्यासाठी विद्या आणि व्रत या दोन्ही गोष्टींची अनिवार्यता आहे. त्या दिशेने आपण प्रवास करण्याची गरज पुन्हा पुन्हा अधोरेखित होत आली आहे. व्रताची वाट चालणारा स्नातक हा स्वत:वर विजय मिळवणारा असतो. त्याच्या अंगी आत्म दमनाची आणि आत्म नियमनाची कौशल्ये असतात. अशा पध्दतीने जेव्हा एखादा विद्यार्थी वाट चालतो, तेव्हा तो विद्यार्थी जीवनात अत्यंत आत्मविश्वासाने जीवनात प्रवेश करतो. जीवनातील प्रत्येक समस्येला सामोरे जाण्याची हिम्मत त्याच्यामध्ये सामावलेली असते. ज्ञानाची साधना केलेली असते. आत्मविश्वास ठासून भरलेला असल्याने स्वाभिमान ठासून भरलेला असतो. त्यामुळे कोणत्याही समोर लाचारी पत्करण्याची शक्यता नाही. ज्ञानामुळे स्वाभिमान निर्माण होत असतो. त्यामुळे लाचारीने नतमस्तक होण्याची वृत्ती निर्माण होत नाही. त्याच्या वर्तनात वीराचा आवेश असतो; मात्र नतमस्तक होत नाही, याचा अर्थ तो उध्दट, गैरवर्तनी असतो असे नाही. त्याच्या स्वाभिमानात लाचारी नसेल इतकेच. ज्ञानी माणसाच्या जीवनात तर विनम्रता ठासून भरलेली असते. त्याच्या इतकी विनमता इतर कोणाकडे असण्याची शक्यता नाही. ज्ञानाची जाणीव झालेली माणसे स्वत:ला अधिक जाणत असतात. स्वत:ची ओळख त्यांना अधिक सुक्ष्म असते. स्वत:चे मूल्य ज्ञात असल्याने आणि जगाचा ज्ञानाचा पसारा माहीत असल्याने त्यांना अहंकाराचा वारा स्पर्श करत नाही.

अहंकाराचा संबंध ज्ञानाशी कधीच नसतो. माहितीने युक्त माणसे अंकारी असतील. त्यामुळे आपले संत कधीच अहंकारी दिसत नाही. त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाच्या साठ्यामुळे त्यांना अहंकाराचा वारा स्पर्श करत नाही. उलट त्यांनीच सतत ईश्वराकडे प्रार्थना करताना म्हटले, की, अहंकाराचा वारा न लागो राजस्वामी विष्णूदासा भाविकाशी ही प्रार्थना म्हणजे स्वत:ची ओळख आहे. जगाशी ओळख होण्यापूर्वी माणसे स्वत:ची ओळख करण्याकडे ज्ञानी माणसांचा अधिक ओढा असतो. स्वत:ला ओळखणे हे शिक्षणाचे काम आहे. आपण त्यादृष्टीने शिक्षणात काही पेरायला हवे आहे. विनोबा, गांधी त्यादृष्टीने शिक्षणाकडे पाहतात. एकदा आईन्सटानईन आपल्या कामाचे निमित्ताने विद्यापीठात चालले होते. बस स्थानकावर ते बसची प्रतिक्षा करत होते. त्यांच्या सोबत एक व्यक्ती हाती पुस्तक घेऊन उभी होती. तीही बसची प्रतिक्षा करत होती. पुस्तक पाहून आईन्सटाईन म्हणाले, की जरा पुस्तक पाहण्यासाठी देता का? त्यांच्या हाती पुस्तक होते त्यांनी तत्काळ हो म्हणत पुस्तक दिले. बस आली तर ते पुस्तक परत दिले. दोघेही बसमध्ये चढले आणि बसले. दोघांना एकाच ठिकाणी जायचे असल्याने आईन्स्टाईन यांनी पुस्तक मागून घेतले. त्यांनी पुस्तक चाळले तोपर्यंत त्यांचा थांबा आला. दोघेही उतरले. नमस्कार झाला. तेव्हा पुस्तक परत देताना त्यांनी आभार मानले. तेव्हा ज्यांचे पुस्तक परत करताना गप्पा झाल्या. पुस्तकाचा मालक पुस्तकाविषयी भरभरून बोलला. पुस्तकाची महती त्यांनी सांगितली. पुस्तकाचे मोल सांगून झाले. निरोप घेण्याची वेळ आली तेव्हा आईन्स्टाईन यांनी विचारले की, तुम्ही काय करता? तेव्हा ती व्यक्ती म्हणाली, मी भौतिक शास्त्राची

प्राध्यापक आहे, तर मग त्या प्राध्यापकाने आईन्स्टाईन यांना विचारले तुम्ही काय करता? तेव्हा आईन्स्टाईन म्हणाले, मी भौतिक शास्त्राचा विद्यार्थी आहे. तुमच्या हाती जे पुस्तक आहे त्या पुस्तकाचा मी लेखक आहे. खरेतर आईन्स्टाईन हे नाव प्रचंड ज्ञानसंपन्नतेची साक्ष देत होते. तरीपण ते म्हणाले, मी भौतिक शास्त्राचा विद्यार्थी आहे. हे फारच कौतुकास्पद होते; पण यामागे कारण होते ज्ञान. ज्या झाडाला अधिक फळे लागतात ते अधिक वाकलेले असते. त्याच्या अंगी एकप्रकारे विनम्रता असते. ज्ञानी माणसे देखील अशीच असतात. त्यामुळे व्रत स्नातक विनम्र असतात; मात्र त्यांची विनम्रता म्हणजे लाचारी नाही. ज्ञानी माणसांच्या जीवनात साधेपणा ठासून भरलेला असतो. त्याच्या वर्तनात तो नेहमी अधोरेखित होतो; मात्र माहितीने संपन्न असलेल्या व्यक्तीच्या जीवनात विनम्रता नसते. त्यामुळे जीवनात यश मिळत नाही. पदवी असूनही केवळ विद्या स्नातक राहतो, तो व्रत स्नातक म्हणून स्वत:ची प्रतिमा निर्माण करण्यात अपयश येते. विनय संपन्नता हे लक्षण शिकलेल्या माणसाचे असायला हवे; मात्र आज ते तर न शिकलेल्या माणसांच्या अंगी अधिक जाणवते. त्यामुळे त्याबद्दलचा विचार केला, तर आपल्याला शिक्षणातून जे ध्येय साध्य करायचे आहे, ते साध्य होताना दिसत नाही.

शिकलेल्या माणसांच्या अंगी विनम्रता आपोआप येते. याचे कारण शिक्षणातून ज्ञानाचा परिचय झालेला असतो. आपण जेव्हा ज्ञानाची वाट चालू लागतो, तेव्हा त्या वाटेचा विस्तार आपल्याला सहजतेने लक्षात येतो. ती वाट न संपणारी आहे. ज्ञानाचा महासागर आहे. तो कधीच न संपणारा आहे. न संपणाऱ्या ज्ञानाची जाणीव झाली, की आपल्याकडे असलेलया ज्ञानाबद्दल आपल्याला काहीच वाटेनासे होते. याचे कारण लोक ज्याला ज्ञानी समजतात त्या माणसाला जगाच्या ज्ञानाची जाणीव असल्याने तो स्वत:ला एका अर्थाने ज्ञानशून्य समजत असतो. हे तर ज्ञानाचे मोल आहे. ज्यांना ज्ञानाची जाणीव हाते, त्यांनाच ज्ञानाची भूक लागते. आपल्या शिक्षणाचे उद्दिष्टे आहे, की निरंतर शिक्षण. जीवनभर माणूस शिकत राहायला हवा; मात्र आपल्याकडे माणसे शिकत नाही. पदवी घेतली की, त्या पदवीमुळे जणू आपल्याला त्या विषयाचे जगात असलेले सर्वच ज्ञान मिळाले अशी जणू धारणा होते. त्यामुळे ज्ञानाची तहानच लागत नाही. ज्ञानाची तहान लागत नसल्याने ज्ञानापर्यंतचा प्रवास झाल्याचे दिसत नाही. ज्ञानाची वाट सापडली तरच विनम्रतेची वाट चालता येते. जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत ज्ञानाची साधना केली तरी ते ज्ञान संपत नाही. त्यामुळे आपल्याला असलेल्या ज्ञानांच्या जाणिवेमुळे नम्रता आपोआप येते. आपण ज्या वाटेने जातो आहोत, त्या वाटेने समाजाने यावे म्हणून प्रयत्न केले जातात. ज्ञानी माणसे हीच समाजासाठी मार्गदर्शक असतात. त्याच वाटेचा प्रवास हा सर्वांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे आपल्याला शिक्षणातून केवळ विद्या स्नातक नको, तर व्रत स्नातकाची गरज आहे. विनोबाची वाट शिकलेल्या प्रत्येकालाच यशाच्या शिखरावर घेऊन जाणारी आहे. अशा संपन्न व्यक्तीमत्वांचा समाज बनतो आणि राष्ट्र प्रगत होते, म्हणून आपण वाट चालण्याची गरज आहे.

❑❑❑❑

## जिंदगी

कु.विजय म्हस्के (S.Y. B.A.)



*जिंदगी वह समंदर है*
*जिसका किनारा प्रेम है ।*
*जिंदगी व भंवर है*
*जिसमे सेंकडों गम है ।।*
*जिंदगी वो सफर है*
*जिसमें हजारों गम है ।*
*जिंदगी वो शहर है*
*जिसमे हम और तुम है ।।*

❑❑❑❑

## महिला सबलीकरण व सक्षमीकरणातील निलिमा मिश्रा यांचे योगदान...



संकलन : कु.भागुबाई आगिवले (t.Y.B.A)

भारतासारख्या विकसनशील देशात दिवसेंदिवस आर्थिक विषमता व बेरोजगारी वेगाने वाढत आहे. एकीकडे शहरांचा विकास तर दुसरीकडे खेडे भकास बनत चालले आहे. अशा काळात खेडेगावांचा विकास करण्याचा ध्यास घेत व प्रसिध्दीपासून दूर राहणाऱ्या महिला सबलीकरण व सक्षमीकरणाचे बचत गटांतून कार्य करणाऱ्या गोधडी वाल्या बाई म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकीक असणाऱ्यांपैकी एक नाव म्हणजे निलिमा मिश्रा उर्फ निलिमादिदी. जीवनात प्रत्येकालाच स्व ची ओळख योग्य वेळी होतेच असे नाही पण ज्यांना अशा स्वची ओळख वेळीच होते त्यांच्या पुढील प्रवास मात्र सुकर व नियोजनबध्द असतो. मी स्वतंत्र व्यक्ती आहे आणि मला माझ्या समाजासाठी, गावासाठी काही करायचे ाहे, याचा शोध निलिमा मिश्रा यांना लवकरच लागला आणि त्यातूनच त्यांनी वयाच्या १३ व्या वर्षी लग्न न करण्याचा आणि ग्रामोध्दारासाठी सर्व आयुष्य झोकून देण्याचा धाडसी निर्णय घेतला. गाव परीसरातील अनेक गोष्टींचा अभ्यास करत त्यातील उणीवा व मर्यादा लक्षात घेतल्या त्यात सकारात्मक आमुलाग्र बदल कसा घडून आणता येईल यादृष्टीने अनेकांशी चर्चा केली. आपल्या ध्येयासाठी वाटेल ते करण्याची धमक दर्शवली. गावातील कुशल, अर्धकुशल मनुष्यबळ व त्यांच्या कौशल्यांच्या माध्यमातून रचनात्मक कार्य उभे करण्यातून त्यांची ओळख सर्वदूरवर पोहोचली. गोधडी सारख्या अस्सल पारंपारीक अंथरुण पांघरुणाला, सर्व सामान्य अडाणी स्त्रियांच्या शिवणावळींच्या ओबडधोबड कला कौशल्याला त्यांनी थेट आतंरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून दिली. ग्रामीण भागातील गोधडी (वाकळ) व आंतरराष्ट्रीय व्यापार या समीकरणातून कोणातही व्यवसाय स्वत:च्या जिद्द, चिकाटी व अविरत परिश्रमाच्या बळावर कसा यशस्वी करता येतो, याचा त्यांनी आदर्श घालून दिला. बहादूरपूर या खेडेगावाचे नाव जगाच्या नकाशावर कोरले गेले.

**➠ बालपण, शिक्षण व संस्कार :**

बहादूरपूर हे धुळे व जळगावच्या सीमेवरील सुमारे साडेचारशे पाचशे लोकसंख्येचे छोटेशे खेडेगाव. अल्पउत्पन्न देणारी शेती व एकेकाळी पूर्ण अविकसित असलेले गाव. पण आज या गावाचा निलिमा मिश्रा यांनी विविध सोयी सुविधा, सुधारणा, योजना, उपक्रमांतून कायापलट केला आहे. याच गावात मिश्रा कुटुंबाच्या सात-आठ पिढ्या गेल्या आहेत. सुखी समाधानी असलेल्या या कुटुंबाने स्वत:भोवती मात्र कधी स्वार्थी कोश विणला नाही. निलिमा मिश्रा यांचा जन्म १ जून १९७२ रोजी जळगाव जिल्ह्यातील बहादूरपूर (ता.पारोळा) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव चंद्रशेखर गणेशप्रसाद मिश्रा तर आईचे नाव निर्मला. बालवयातच निलिमांच्या संवेदनक्षम मनावर सभोवतालच्या दु:ख, गरीबी, दारिद्र्य, भूक, उपासमार व त्यामीगल दुष्काळ, बेकारी, बेरोजगारी या कारणमीमांसेने विपरीत परिणाम झाला. त्यातून त्या अधिकच अंतर्मुख होत गेल्या. बरोबरीच्या सवंगड्यामध्ये रमणं, खेळणं, बागडणं त्यांच्या नशीबी त्यामुळे फारसचे नव्हते. सभोवतालच्या लोकांचे प्रश्न, समस्या निराकरणाच्या विचारातून त्यांनी आपले भविष्यातील ध्येय बालपणीच निश्चित केले.

निलिमांनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बहादूरपूरमध्येच तर धुळ्यातील जयहिंद महाविद्यालयातून मानसशास्त्र विषयात बी.ए. पदवीचे शिक्षण घेतले. त्यांनी पुढे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मानसशास्त्र विभागात मानसशास्त्रातील क्लिनिकल सायकॉलॉजी या विषयात एम.एम. केले. आपल्या ध्येयाच्या दिशेने मार्गक्रमाणासाठी त्यांनी डॉ.श्रीनाथ कलबार यांच्या पाबळ (पुणे) विज्ञानाश्रमाची निवड केली. शिक्षण आणि विज्ञान यांच्या मदतीने ग्रामविकासाचं मॉडेल त्यांनी तिथेच जाणले. आश्रमात विविध

कामे व जबाबदाऱ्या डॉ.कलबाग यांच्या मानसकन्येप्रमाणे सांभाळल्या. एवढे उच्च शिक्षण गेल्यानंतरही शहरी भागात भरगच्च पगाराची नोकरी न करता ग्रामउन्नतीच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले. निलिमा मिश्रा यांचे औपचारीक व अनैपचारीक शिक्षण तसेच सर्वागीण व्यक्तीमत्वाचा विकास व इतर संस्कार बहुतांशी जन्मगावी झाले बालपणापासूनच पशुपक्षी प्राणीमात्रांवर दया करा, तहानलेल्या भुकेलेल्या पोटी अन्न, पाणी घाला, गरजवंताला मदत करा इ. शिकवण त्यांना कुटुंबातील वडिलधाऱ्यांकडून मिळाली म्हणूनच तर त्या किडामुंग्यांना साखर, पिठ खाण्यास देणे, चिमण्यांना दाणे टाकणे, आपल्या स्वयंपाकातील पहिली भाकर गायी व कुत्र्याला चारणे, दारावरील भिकाऱ्याला अन्न देणे, स्वत:बरोबर इतरांच्या पोटात हक्काचं पोटभर अन्न व घोटभर पाणी देण्यासाठी आजवर त्या कटाक्षाने झटत असतात. त्यांचे हे संस्कार आज त्यांची आयुष्यभराची शिदोरी बनली आहे.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेत असताना त्यांना नेहमीच गुरुजनांचे मार्गदर्शन लाभले वक्तृत्व व इतर स्पर्धा तसेच समाजसेवा व देशसेवा सामाजिक बांधीलकी यासर्वांमध्ये त्या अग्रेसर असत. कुमार वयात अवघ्या तेराव्या वर्षी त्यांनी लग्न न करण्याचा दृढ निश्चय केला. आपले सारे आयुष्य ग्रामविकासात व्यतीत करण्याचे ठरविले. त्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्थांकडून मिळेल ते ज्ञान माहिती व शिक्षण घेतले. पुणे विद्यापीठात शिक्षण घेत असतांना १९९३ मध्ये महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात किल्लारीला भूकंप झाला तेथे मदतीसाठी अनेक स्वयंसेवकांची गरज असल्याचे पोस्टर्स जागोजागी लावलेले होते. त्यांच्या वर्गमैत्रींनी त्यांना तूला समाजकार्य करावयाचे आहे तर मग तू किल्लारीला जा असे सांगितले. पण निलिमा यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु ग्रामरचना, गावउभारणी व उन्नतीच्या दृष्टीने रचनात्मक व दिर्घकालीन काम करण्याचे स्वप्न त्यांना स्वस्त बसू देत नव्हते. शिवाय या कामाची सुरुवात कशी व कोठून करावी याबाबत प्रचंड संभ्रमावस्था होती. यानंतर त्या काही दिवसांनी गावी आल्याची माहिती त्यांची मैत्रीण निरीती हिस कळल्यावर तिने पत्र लिहून त्याबाबत खंत व्यक्त केली. तू किल्लारीला स्वयंसेवक म्हणून न जाता गावी गेल्यामुळे तुझे ध्येय कसे साध्य होणार? समाजसेवेची चांगली संधी तू नाकारली. याशिवाय वडिलांनीही त्यांना सुनावले की, तू घरी धुणी, भांडी करणार आहेस का? यासाठी तूला शिकवले का? तूला नेमके करायचे आहे तरी काय? तूला जे करायचे ते करुन दाखव आणि ते केल्याशिवाय घरात पाय ठेवू नकोस. यामुळे निलिमा यांना नाईलाजास्तव पुन्हा पुण्याला यावे लागले.

**➠ समाजकार्याची प्रेरणा :**

पुण्यात आल्यानंतर त्यांनी सामाजीक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची माहिती मिळवली. त्यांच्या सटाणा (जि.नाशिक) येथील मित्र मैत्रिणींच्या ग्रुपने डॉ.कडबाग यांच्या प्रकल्पाची माहिती दिली. निलिमा यांनी लगेचच १९ जुलै १९९५ रोजी डॉ. कलबाग यांच्या विज्ञानाश्रमाला भेट घेऊन त्यांच्या अनेक कार्याची प्रत्यक्ष माहिती घेतली. आपले स्वप्नातील ध्येय त्यांना सांपून त्याबाबत मार्गदर्शन घेतले. पुढे डॉ.कलबाग यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्वयंसेवी संस्थांना भेटी दिल्या त्यातून निलिमांच्या लक्षात आले की, चार पुस्तके वाचून, पदवी घेऊन कोणी तज्ञ बनत नाही तर हजारो वर्षापासून जी समाजरचना आहे त्या समाजाला त्यांचे प्रश्नोत्तरे माहित असतात. पुढे निलिमा यांची विचारांची व ग्रामरचनेबाबतची संकल्पना अधिकाधिक स्पष्ट होत गेली. शिक्षणातून ग्रामविकास कसा साधावा याचा वस्तूपाठ त्यांना डॉक्टरांकडून मिळाला परंतु त्यासाठी त्यांना आपल्या आयुष्यातील आठ वर्ष (१९९५ ते २००३) विज्ञानाश्रमात घालवावे लागले. तिथेच त्यांना जीवनव्यवहारातील अनेक प्रश्नाची उत्तरे मिळाली. निलिमाजींना पुण्यातील विज्ञान आश्रमात इलेक्ट्रीक वायरींग करणे, खाद्यपदार्थ बनविणे, पॅथॉलॉजीकल चाचण्या घेणे, कुकुटपालन, वेल्डींग,

शेतीकरणे, सुक्ष्म हिशोब ठेवणे, संगणक ज्ञान, पुस्तक छापणे, बायडींग करणे इ. चे परीपूर्ण मान मिळाले. तेथील तेवीस शाळांमध्ये मुलभूत तंत्रज्ञानाची ओळख करुन देण्याची जबाबदारी त्यांनी सांभाळली. या सर्वांचा फायदा त्यांना आपल्या पुढील काळात झाला.

**➠ भगिनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन :**

डॉ.कलबाग यांच्या विज्ञान आश्रम या प्रकल्पात काम करतांना निलिमांनी मुद्दाम ठराविक महिने विनावेतन काम केले. त्यातून त्यांची कार्यक्षमता व समायोजनशिलता स्वत:च आजमावली. पण ध्येयाप्रती असलेली निस्सीम तळमळ मात्र ढळू दिली नाही. येथून त्या ३१ मे २००३ रोजी बहादूरपूरला परतल्या. तत्पूर्वीच सन २००० मध्ये आपल्या कामाची मुहूर्तमेढ भगिनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन संस्था सुरु करुन रोवली. पुढील सत्तावीस वर्षाचे नियोजन ९&९ वर्षांच्या टप्प्यात विभागले. सरकारी अनुदानाविना काम करण्याचे ठरविले. पण सरकारी अनुदानाविना काम कसे करायचे याबाबत संस्थेचे इतर सदस्यांच्या मनात शंका होती. त्यावर एक मत होत नव्हते. समाजकार्यात सहकार्य कुणाचे व कसे घ्यावे? आर्थिक मदत कोठून मिळवावी व काम करावे? असे नानाप्रश्न मनात येत होते. पण अशाही परिस्थितीत सर्वांशी मिळून मिसळून राहत, सर्वांच्या गरजा लक्षात घेवून सुचेल त्या वाटेने पुर्ण क्षमतेने, उत्साहाने मार्गक्रमण करण्याचे ठरविले. विविध छोट्या-मोठ्या वस्तू प्रथमत: कच्च्या मालापासून बनविल्या. गावातील लोकांना, महिलांना संगणक प्रशिक्षण दिले. सुरुवातीच्या काळात ज्या स्त्रिया घरातून बाहेर पडत नव्हत्या त्याच स्त्रिया आपला माल, वस्तू, पदार्थ, उत्पादने विकण्यासाठी स्वत:चा गाव व इतर बाजारपेठा विविध प्रदर्शने येथे घेवून जात. त्यातून चांगला नफा, उत्पन्न कमावू लागल्या. आपल्या आतूबाजूच्या इच्छूक महिलांनाही या कामात सहभागी करून घेतले. जीवनमान व राहणीमानात आमूलाग्र बदल निलिमादिदींमुळे घडू लागला. त्यांनी सुमारे अठराशे स्वयंसहायता महिला बचत गट सुरू केले. यातून संस्थेचा कार्यविस्तार वाढत गेला. विविध ठिकाणी देशविदेशात व्याख्याने, प्रदर्शने, चर्चासत्रे यात निलिमांना आमंत्रित करण्यात येवू लागले. एकदा अमेरिकेत एका कॉन्फरन्सला जाण्यासाठी त्यांचा व्हिसा केवळ आर्थिक स्थिती उत्तम नसल्याचे सांगत नाकारण्यात आला. परंतु पुढे निलिमांचे आजवर कार्य व विलक्षण व्यक्तिमत्त्व पाहून लगेच मंजूरही करण्यात आला.

**➠ गाव हीच प्रयोगशाळा :**

निलिमा यांनी आपल्या गावचे सूक्ष्म निरीक्षण बालपणापासूनच केलेले होते. गावातील अशिक्षीत, अडाणी, आदिवासी, शेतकरी, बहूजन जात समूहाचे बहुतांशी लोकसंख्या विशेषत: काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचे ठरविले. स्वयंरोजगार व आर्थिक क्षमता विकसित करण्यासाठी महिलांच्या अंगभूत, पारंपरीक सुप्त कौशल्याने शोध घेतला. उदा. वर्षभरासाठी विविध टिकाऊ पदार्थ बनविणे, सणासुदीला मिष्टान्न बनविणे, लग्नकार्यात गाणे म्हणणे, नृत्याभिनय करणे, अल्पकमाईत, कुटुंब काटकसरीने चालविणे, शेतीत दिवसरात्र काबाडकष्ट करणे, जुन्या न वापरल्या कपड्यांपासून छोटी मोठी गोधडी, वाकळ, झबले, अंगडे, टोपले, कंबरपिशवी, बटवा बनविणे इ. म्हणूनच त्यांनी या स्त्री कौशल्यावर आधारीत नवीन काही तरी हटके काम आपल्याच गावात उभे करण्याचे ठरविले. त्यातुन गावातील प्रत्येक व्यक्तीचे कोणते ना कोणते कला कौशल्य दैनंदिन कामाचे स्वरुप व पध्दती यांचा सुरेख मेळ घालत त्यांनी बहादूरपूरचा मुखवटा बदलवला. या सर्व बाबी त्यांच्या पुढील कार्यास दिशादर्शक ठरल्या. एका अर्थाने त्यांचे हे गाव नानाविध प्रकल्प राबविण्यासाठी एक कार्यशाळा व प्रमुख कार्यक्षेत्रच बनवले

**➠ महिला सबलीकरण व सक्षमीकरण :**

'जागतिक महिला दिन' व सावित्रीबाई फुले पुण्यतिथी निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ''त्वचेची काळजी'' या विषयावर गुंफताना डॉ.मनीषा आव्हाड आंधळे म्हणाल्या की, ''त्वचा हा मानवी शरीराचा अत्यंत महत्वाचा नाजूक व संवेदनशील अवयव आहे. त्यामुळे उन्हाळा पावसाळा व हिवाळा या तिन्ही ऋतूंमध्ये होणाऱ्या विविध वातावरणीय बदलांमुळे आपल्या त्वचेवर अनुकूल वा प्रतिकूल परिणाम होत असतात. त्यामुळे त्वचेची योग्यवेळी योग्य ती काळजी घेण्याची गरज असते. पण ही काळजी घेताना किंवा त्यावर उपाय करत असताना सहज ऑनलाईन व ऑफलाईन बाजारपेठेतील उपलब्ध होणारी सौंदर्यप्रसाधने खरेदी करण्यापूर्वी तज्ञ व्यक्तीचा सल्ला जरूर घ्यावा. तसेच बाजारपेठेतील अशी सौंदर्यप्रसाधने व उत्पादने योग्य आय.एस.आय.मानांकन असल्याची खात्री करावी. योग्य व्यक्तीचा किंवा तज्ञ वैद्यकिय डॉक्टरचा सल्ला घेतल्याशिवाय अशा प्रकारचे सौंदर्यप्रसाधने वापरणे घातक असतात.'' याशिवाय डॉ.मनीषा आव्हाड नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना तारुण्यपिटीका, त्वचेवरील लालसरपणा, विविध डाग व चट्टे, चेहऱ्यावरील खडबडीतपणा, केसगळती यांमागील कारणे व उपाय याविषयी सविस्तर माहिती दिली. त्वचेची योग्य निगा राखण्यासाठी योग्य सात्विक आहार व नियमित व्यायाम हाच एक प्रमुख उपाय असून त्यामार्फतच शरीराला वा त्वचेला पोषक असणारे योग्य जीवनसत्वयुक्त घटक मिळत असतात. यातील काही घटकांच्या अति कमी जास्त कमतरतेमुळे मानवी त्वचेच्या अनेक समस्या निर्माण होत जातात असे सांगितले.

व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प ''महिलांचे आरोग्य'' या विषयावर गुंफताना डॉ.रोहिणी आव्हाड नागरगोजे म्हणाल्या की, ''महिलांना ऋतुप्राप्ती ही एक नवसृजन व सर्जनशीलतेसाठीची एक देणगी आहे. त्यानंतर दर महिन्याला सुरु होणारी मासिकपाळी हे एक संकट नसून नवनिर्मितीची संधी असते. परंतु याउलट समाजात मात्र विशेषत: महिला वर्गात समज कमी गैरसमज जास्त पहावयास मिळतात. म्हणून तळागाळातील ग्रामीण महिलांमध्ये सखोल प्रबोधन व जनजागृती होणे गरजेचे आहे. त्यासाठी महाविद्यालयांतून अशा विविध व्याख्यानमालेचे आयोजन करुन महिलांच्या आरोग्याविषयी जाणीव व जागृती करणे खूप उपयुक्त आहे.'' याशिवाय डॉ.रोहिणी आव्हाड नागरगोजे यांनी महिलांचे मासिक पाळी, ॲनिमिया, विविध आरोग्य विषयक समस्या

विषद करुन मासिक पाळीचे टप्पे, चक्र, समज-गैरसमज, या काळात योग्य संतुलन ठेवण्यासाठी उपाय, योग्य जीवनसत्वयुक्त पौष्टिक आहार, व्यायाम, वैयक्तिक स्वच्छता, पंचकर्म उपचार याविषयी मार्गदर्शन केले.

■ **शिवस्वराज्य दिन आणि युवासप्ताह :**

महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०१ जून ते दि.०७ जून २०२२ याकालावधीत शिवस्वराज्य स्थापनादिनाचे औचित्य साधून युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहा अंतर्गत काव्यवाचन, अंताक्षरी, रांगोळी, गीतगायन, निबंध, वक्तृत्व, संगीत खुर्ची व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. याबरोबरच महाविद्यालयात साडी डे, टाय डे, कॅप डे, रोझ डे, पारंपारिक वेशभूषा दिन साजरे करण्यात आले. दि.६ जून रोजी इतिहास विभाग प्रमुख प्रा.राजेंद्र केदार यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे सामाजिक व राजकीय विचार याविषयावर व्याख्यान दिले.

- **प्रा.वाकचौरे एन्. बी.** (विभाग प्रमुख)

OOO

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)
### नियमित कार्यक्रम अहवाल
### सन : २०२१-२०२२

■ **स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवडा :**

दि.१ ऑगस्ट २०२१ ते १५ ऑगस्ट २०२१ या कालावधीमध्ये स्वच्छ व स्वस्थ भारत भारत अभियानांतर्गत 'ग्रामस्वच्छता व संत गाडगेबाबा यांचे विचार' या विषयावर दूरदृश्यप्रणाली द्वारे प्रा.प्रशांत उगले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानातून ग्रामस्वच्छते बाबत संत गाडगेबाबा यांच्या मौलिक विचार सांगत कोरोना या जागतिक महामारीच्या काळात कोणती काळजी व दक्षता घ्यावी हेही विषद केले.

■ **पोषण महिना संपन्न :**

दिनांक १ ते ३० सप्टेंबर २०२१ या दरम्यान 'पोषण आहार महिना' युवा व खेळ विभाग तसेच महिला बाल विकास मंत्रालय यांच्या निर्देशानुसार साजरा करण्यात आला. या निमित्ताने सोशल मिडियाच्या झूम अॅप्सद्वारे ऑनलाईन उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना आपल्या व्याख्यानातून मार्गदर्शन करताना राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.प्रशांत उगले म्हणाले की, ''पोषण आहार हा महिना साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश लोकांमध्ये खाण्यापिण्यापासून आरोग्याशी संबंधित जागरुकता पसरवणे हाच आहे. शास्त्रज्ञांच्या मते, पोषण हे आवश्यक आहार आरोग्य आणि विकासाचे मुख्य केंद्र आहे. पोषण आपल्याला शारीरिक, मानसिक शक्ती आणि ऊर्जा देते. योग्य प्रमाणात पोषण मिळाल्याने आपल्याला निरोगी आणि तंदुरुस्त वाटते.'' यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.प्रशांत उगले यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील राष्ट्रीय स्वयंसेवकांनी पोस्टर्स, घोषवाक्य तयार करुन कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रत्यक्ष आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करत अनेक उपक्रम राबविले.

■ **राष्ट्रीय सेवा योजना दिवस :**

दि.२४ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात रा.से.यो.दिन साजरा करण्यात आला. तसेच रा.से.यो.दिन साजरा करण्यात आला. तसेच रा.से.यो.दिनानिमित्त स्वयंसेवकांनी NSS लोगो व कोव्हिड लसीकरण प्रबोधन रांगोळी रेखाटन केले. वरील विषय व आशय अधोरेखित करणारे विविध चित्र व पोस्टर्स बनविले. त्यामार्फत समाजात जनजागृती केली.

■ **आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत स्वच्छ भारत अभियान महिना व कोव्हिड लसीकरण शिबीर :**

दि.१ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर २०२१ दरम्यान दुरदृश्य प्रणालीद्वारे विविध व्याख्यानाचे आयोजन करण्यात

आले. त्यामध्ये २ ऑक्टोबर गांधी जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने सोशल मिडियाच्या झूम ॲप्सद्वारे महात्मा गांधी यांचे विचार या विषयावर प्रा.एस.बी.भाबड यांचे ऑनलाईन व्याख्यान घेण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील कोव्हीड लस न घेतलेल्या सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि ग्रामीण रुग्णालय दापुर अंतर्गत उपकेंद्र दोडी बुद्रुक यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २५ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयात Covid-19 कोव्हीड लसीकरण शिबीर घेण्यात आले.

**■ माझी वसुंधरा उपक्रम :**

दिनांक ११ सप्टेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक नावनोंदणी बाबत माझी वसुंधरा उपक्रम अंतर्गत माझी वसुंधरा या विषयी दुरदृश्य प्रणालीद्वारे प्रतिज्ञा करण्यात आली. तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी माहिती सांगून नावनोंदणी करुन इ.प्रमाणपत्र प्राप्त केले.

**■ राष्ट्रीय एकता दिवस निमित्त सतर्कता जागरुकता सप्ताह :**

दिनांक ३१ ऑक्टोबर ६ नोव्हेंबर २०२१ या काळात महाविद्यालयात दुरदृश्य प्रणालीद्वारे राष्ट्रीय एकता दिवस निमित्त सतर्कता जागरुकता सप्ताह साजरा करण्यात आला.

**■ जागतिक एड्स दिन :**

दिनांक १ डिसेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात जागतिक एडस दिन निमित्ताने रांगोळी रेखाटन व निबंध लेखन करण्यात आले. त्यासाठी एडस आजाराविषयी प्रबोधन ही संकल्पना घेण्यात आली.

**■ आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत संविधान दिन विशेष उपक्रम :**

दिनांक १५ ते ३१ डिसेंबर २०२१ रोजी महाविद्यालयात संविधान दिनाचे औचित्य साधून सर्व राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयंसेवक व प्राध्यापक यांनी भारतीय संविधानातील उद्देशिकेची सामुहिक वाचन केले आणि शपथ घेतली.

**■ बालिका दिन :**

दिनांक २० जानेवारी २०२२ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने महाविद्यालयातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी 'सेल्फी विथ डॉटर' संकल्पना प्रतिमा काढल्या. तसेच २४ जानेवारी २०२२ रोजी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' याविषयी मा.सौ.सरला नवले जगदाळे यांचे व्याख्यान संपन्न झाले.

**■ राष्ट्रीय मतदार दिन :**

दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय मतदार दिन जनजागृतीपर रांगोळी रेखाटन व निबंध लेखन करण्यात आले. त्यासाठी राष्ट्रीय मतदार प्रबोधन व लोकशाही महोत्सव ही संकल्पना घेण्यात आली.

**■ जागतिक महिला दिन :**

दिनांक ८ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात जागतिक महिला दिन निमित्ताने 'महिला काळ, आज आणि उद्या' या विषयावर प्रा.कल्पना घुगे यांचे व्याख्यान संपन्न झाले तसेच विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक १० मार्च रोजी 'जागतिक महिला दिन' व सावित्रीबाई फुले पुण्यतिथी निमित्ताने सिन्नर येथील स्पर्श हॉस्पिटलच्या संचालिका, आयुर्वेद व पंचकर्म तज्ञ मा.डॉ.रोहिणी आव्हाड नागरगोजे व त्वचारोग तज्ञ मा.डॉ.मनिषा आव्हाड-आंधळे यांचे अनुक्रमे 'महिलांचे आरोग्य' आणि 'त्वचेची काळजी' या विषयांवर विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानमाला संपन्न झाली.

- **प्रा.उगले पी. एस.** (कार्यक्रम अधिकारी)

- **प्रा.डॉ.शेख एन. ए.** (कार्यक्रम अधिकारी)

OOO

# विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

## सन २०२१-२०२२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना आणि कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे खंबाळे येथील श्री सिध्द कपिलेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खंबाळे, ता.सिन्नर, जि.नाशिक या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मंगळवार दि. २८ डिसेंबर २०२१ ते सोमवार दि. ३ जानेवारी २०२२ या कालावधीमध्ये येथे आयोजित करण्यात आले होते.

**■ पहिला दिवस :**

मंगळवार २८ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व स्वयं सेवक शिबिर स्थळी खंबाळे गावात सकाळी ७.३० वाजता पोहचले व प्रथमत: शिबीर निवासस्थान परिसर म्हणजे खंबाळे येथील नवीन ग्रामपंचायत कार्यालय इमारत व श्री.सिध्द कपिलेश्वर महाराज मंदिर परिसर यांची साफसफाई केली. दुपारी शिबीर उदघाटनाची तयारी करण्यात आली व दुपारी ३ वा. गावाचे उपसरपंच मा.सौ.जिजाबाई आंधळे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री.पांडुरंग गणपत केदार हे होते. त्यानंतर नियोजित श्री.शांताराम डोंगरे सर यांनी वृक्षारोपण व संवर्धन या विषयावर व्याख्यान झाले.

**■ दुसरा दिवस :**

बुधवार दिनांक २९ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ६ वा सर्व स्वयंसेवकांनी व्यायाम, योग, व प्रार्थना करुन सकाळी ८ ते १२ या वेळेत सिध्द कपिलेश्वर मंदिर परिसर साफसफाई करुन श्रमदान करण्यात आले. झाडांच्या भोवतीचे गवत काढण्यात आले व त्यांना संरक्षण जाळी लावण्यात आल्या. सायंकाळी ५ ते ८ या वेळेत समाज प्रभोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या दिवशी दुपारी नियोजित व्याख्यान मा.प्रा.रवींद्र गायकवाड यांचे जलसंवर्धन या विषयावर झाले.

**■ तिसरा दिवस :**

गुरुवार दिनांक ३० डिसेंबर २०२१ सकाळी ८ ते १२ या वेळेत कामाचे नियोजन करुन सिध्द कपिलेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय परिसर स्वछता व वर्ग खोल्या सफाई तसेच विद्यालय परिसरात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदण्यात आले. या दिवशी 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मा.श्री.ढगे सर यांचे दुपारी ३ वाजता व्याख्यान झाले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत गीतगायन व काव्यवाचन घेण्यात आले.

**■ चौथा दिवस :**

शुक्रवार दिनांक ३१ डिसेंबर २०२१ या दिवशी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खंबाळे येथील परिसर स्वछता करण्यात आली. तसेच परिसरातील नागरीकांमध्ये स्वच्छतेबाबत प्रबोधन व जनजागृती करण्यात आली. या दिवशी युवाव्याख्याते मा.राजेंद्र शिंदे सर यांनी समाजसुधारकाचा वारसा व आजच युवक या विषयावर व्याख्यान दिले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत संगीतखुर्ची व अभिव्यक्ती मनामनाची उपक्रम घेण्यात आला.

**■ पाचवा दिवस :**

शनिवार दिनांक १ जानेवारी २०२२ या दिवशी श्रमसंस्कारमध्ये ग्रामीण रुग्णालय खंबाळे या ठिकाणी परिसर स्वछता व वृक्षारोपणासाठी खड्डे घेण्यात आले. या दिवशी व्याख्याते म्हणून मा.प्रा.बी.एच.कासार यांनी ''जागतिक तापमान वाढ'' या विषयावर व्याख्यान दिले. सायंकाळी सर्व स्वयंसेवकांसाठी बौध्दिक खेळ व मराठी व हिंदी गीतांची अंताक्षरी घेण्यात आली.

**■ सहावा दिवस :**

रविवार दिनांक २ जानेवारी २०२२ रोजी नेहमीप्रमाणे

दिनचर्या आटोपून श्रमदान करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक तयार झाले. नंतर स्वयंसेवकांनी बिरोबा वाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंबाळे येथे शाळा परिसर स्वच्छता व वृक्षारोपणासाठी खड्डे घेतले. या दिवशी मा.श्री.गोरख कराड यांनी ''महात्मा गांधी व राष्ट्रीय सेवा योजना या विषयी व्याख्यान दिले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत अभिनय व कथाकथन स्पर्धा घेण्यात आली.

**■ सातवा दिवस :**

सोमवार दिनांक ३ जानेवारी २०२२ अंगणवाडी, ग्रामपंचायत चौक, ग्रामीण रुग्णालय, खंडेराय पावटी येथे स्वच्छतेसह वृक्षारोपणासाठी खड्डे घेतले. रोजी स्वयंसेवक श्रमदानासाठी सकाळी ८.०० वाजता तयार झाले. शिबीर स्थळी स्वछता करुन शिबीर समारोपाची तयारी करण्यात आली. खंबाळे गावात विविध परिसरात जाऊन राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी कोरोना आजाराविषयी घ्यावयाची दक्षता व उपाययोजना व लसीकरणाविषयी जनजागृती केली. या प्रसंगी प्रा.निलेश वाकचौरे यांनी भारतीय संविधान आणि मुल्यविचार याविषयी व्याख्यान दिले. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत वैयक्तिक व समूह नृत्य घेण्यात आले.

या शिबीर काळात आम्हाला सरपंच उपसरपंच गावातील विविध संस्थामधील पदाधिकारी, तसेच गावातील नागरिक यांनी मोलाची मदत व सहकार्य केले. समारोपप्रसंगी श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व संचालक मंडळ, कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य, सिध्द कपिलेश्वर विद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**- प्रा.उगले पी. एस.** (एन.एस.एस.अधिकारी)

**- प्रा.डॉ.शेख एन. ए.** (एन.एस.एस.अधिकारी)

०००

## - ग्रंथालय विभाग -

महाविद्यालयीन ग्रंथालयाने २०२१-२२ या आर्थिक वर्षात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी व प्राध्यापकांच्या व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार महाविद्यालयाच्या अर्थसंकल्पनातून मौल्यवान असे संदर्भग्रंथ खरेदी केलेले आहेत. महाविद्यालयाच्या अंदाजपत्रकाच्या तरतुदीप्रमाणे या शैक्षणिक वर्षात ६१,५४६/- रुपये किंमतीची ५०७ क्रमिक व संदर्भ पुस्तके खरेदी केली आहे.

प्राध्यापकांना वेगवेगळ्या प्रकारचे वाचन साहित्य उपलब्ध व्हावे यासाठी ग्रंथालय विभाग सतत प्रयत्नशील आहेत. विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी ग्रंथालयात संगणकाद्वारे माहिती स्त्रोत केंद्रात इंटरनेट सुविधा उपलब्ध केलेली आहे. या केंद्रात मुले आणि मुली यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष आहेत तसेच विद्यार्थी कल्याण मंडळांतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यार्थी कमवा व शिका योजने अंतर्गत काम करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली.

विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयामार्फत अनेक उपक्रम राबविले जात आहे. गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी कर्मवीर परिक्षा मार्गदर्शन पुस्तके, चालु घडामोडीचे माहिती असणारे नियतकालिके, नोकरी मार्गदर्शन इत्यादी योजना राबविल्या जातात. त्याचबरोबर ग्रंथालयामार्फत प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या कला व वाणिज्य शाखेतील सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर व उपयोजित वाचनसाहित्याचे मार्गदर्शनही करण्यात येते यात ग्रंथालयाचा कौशल्यपूर्ण वापर संदर्भ ग्रंथाचा सुयोग्य शोध ग्रंथालयातील विविध सेवा व ज्ञान संवर्धनात ग्रंथालयाचे महत्त्व या संदर्भात बहुमोल मार्गदर्शन ग्रंथपाल प्रा.कांगणे व्ही.आर आणि ग्रंथालयीन कर्मचारी केदार के.बी.सतत करत असतो.

ग्रंथालयात नवीन घेतलेल्या पुस्तकांची माहिती

विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना व्हावी यासाठी ग्रंथालयाच्या वाचनकक्षात नवीन आलेल्या पुस्तकांची व नियतकालिकाचे माहिती दर्शनीय भागात मांडणी केलेली आहेत. महाविद्यालयीन ग्रंथालय विभागाचे सी.सी.टी.व्ही. करण झाले आहेत. ग्रंथालयाचे संगणकीकरणाचे काम चालू आहेत.

वरील सर्व उपक्रमासाठी मा.प्रभारी प्राचार्य भाबड बी. एस. प्राध्यापक, ग्रंथालय सेवक, ग्रंथालय समिती, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी या सर्वाचे सहकार्य व मार्गदर्शन आम्हाला मिळत असल्याने ग्रंथालय यशस्वी कडे वाटचाल करुन निश्चितपणे ग्रंथालय उच्च शिखरापर्यंत पोहचेल अशी आम्हास खात्री वाटते.

**- प्रा.कांगने व्ही. आर.** (विभाग प्रमुख)

ooo

# - शिष्यवृत्ती विभाग -

शिष्यवृत्ती विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्तीची माहिती दिली. विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मिळण्यासाठी प्रोत्साहित करुन मार्गदर्शन केले. विभागाच्या माध्यमातून भारत सरकार व पुणे विद्यापीठामार्फत मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचे फॉर्म विद्यार्थ्यांकडून पूर्ण माहितीसह संबंधित विभागाला सादर केला. त्यामध्ये विविध शिष्यवृत्ती योजनेस पात्र ठरलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी संख्या २९४ असून प्रवर्गनिहाय तपशील पुढीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना | - | १९ |
| २) | पदवीस्तर शिष्यवृत्ती योजना (इतर मागास प्रवर्ग) | - | ४४ |
| ३) | पदवीस्तर शिष्यवृत्ती योजना (भटक्या विमुक्त जाती/जमाती) | - | २०५ |
| ४) | भारत सरकार पदवीस्तर शिष्यवृत्ती योजना (अनुसूचित जाती) | - | १५ |
| ५) | पदवीस्तर शिष्यवृत्ती योजना (भारत सरकार) (अनुसूचित जमाती) | - | ११ |
| ६) | फ्रीशिप शिष्यवृत्ती विद्यार्थी | - | ०० |

वरील प्रमाणे महाविद्यालयातील शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन व सहकार्य शिष्यवृत्ती विभागाने केली असून शैक्षणिक वर्ष सन २०२१-२०२२ मध्ये महाविद्यालयात ३७७ पैकी २९४ विद्यार्थी व विद्यार्थिनींना विविध शिष्यवृत्तीस पात्र ठरले असून त्यांचा शैक्षणिक खर्च करण्यास मदत झाली.

**- प्रा.केदार एस. एस.** (विभाग प्रमुख)

ooo

# - मराठी विभाग -

**■ 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' निमित्त मराठी विषयांतर्गत करीअरच्या संधी' या विषयावर व्याखान :**

मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त ऑनलाईन गुगल मिट या आभासी दुरदृश्य आभासी प्रणालीद्वारे मराठी विषयांतर्गत करिअरच्या संधी या विषयावर मुंबई येथील मुक्त पत्रकार मा.सौ.रेश्मा कंदलकर कासार यांचे विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.एस. बी. भाबड हे होते. 'मराठी विषयांतर्गत करिअरच्या संधी' या विषयावर सौ.रेश्मा कंदलकर कासार म्हणाल्या की आजचे युग विद्यार्थ्यांच्या नानाविध कलागुणांना वाव देऊन त्याचे व्यावसायिक संधीत रुपांतर करण्यास मोठ्या प्रमाणात अनुकूल व पोषक आहे. विविध प्रसार माध्यमांतील

करिअरच्या संधी दिवसेंदिवस वाढतच आहे. प्रादेशिक भाषेत रोजगाराच्या संधी शोधणे आवश्यक आहे. पारंपारिक शिक्षणाबरोबरच विविध व्यावसायिक कलाकौशल्ये आत्मसात करुन घेणे काळाची गरज आहे. नव्या युगात पदार्पण करणाऱ्या प्रत्येक युवकाला स्वत:ला अद्यावत ठेवणे आवश्यक बनले आहे.'' कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून मराठी विभाग प्रमुख व विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा.एन.बी.वाकचौरे यांनी महाविद्यालयात मराठी विभागात वर्षभर चालणाऱ्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले की, ''बदल हा निसर्गाचा नियम आहे. काळानुसार माणूस बदलतो. २१ वे शतक माहिती तंत्रज्ञान व यांत्रिकीकरणाचे युग असल्याने अनेक प्रकारचे शोध, उपलब्ध अद्ययावत ज्ञान यांचा मानवी जीवनावर परिणाम होत आहे. नाटक चित्रपट दिग्दर्शक, लेखक, कवी, समीक्षक, कलाकार, वृत्तनिवेदक, रेडिओ जॉकी, संहिता लेखक, भाषांतरकार, अनुवादक, पत्रकार आणि संपादक इत्यादी विविध प्रकारचे क्षेत्र करिअरसाठी खुली आहेत त्यामध्ये निश्चितपणे आपल्या नावाचा वेगळा ठसा उमटवण्यास वाव आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी ही क्षेत्रे नवीन अद्ययावत ज्ञानासह पादाक्रांत करणे गरजेचे आहे.'' सौ.रेश्मा कंदलकर कासार मराठी भाषाविषय अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांनी केवळ एकाच भाषेचा अभ्यास करुन चालणार नाही तर इतर विषय अभ्यासून त्यातील उत्तम ज्ञान ज्ञात करुन त्यात करिअरच्या संधी शोधणेही तितकेच महत्वाचे आहे. विद्यापीठीय शिक्षणात व जागतिक स्तरावर मराठी भाषेचे अनन्यसाधारण महत्व कसे आहे ते सौ.रेश्मा कंदलकर कासार विषद केले. व्याख्यानाच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या विविध शंकाचे निरसनदेखील करण्यात आले.

**■ मराठी राजभाषा गौरव दिन :**

मराठी विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.२८ फेब्रुवारी मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी राजभाषा गौरव दिन ग्रंथप्रदर्शन व विशेष मार्गदर्शनपर व्याख्यान देऊन साजरा करण्यात आला. प्रथमत: सदर दिवशी सकाळी ८.०० ते ९.०० वाजेपर्यंत ग्रंथालय विभागात विद्यार्थ्यांसाठी निवडक ग्रंथांचे ग्रंथप्रदर्शन, त्यानंतर सकाळी ९.०० ते ९.३० वाजता ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. व्ही.आर. कांगणे यांचे 'मराठी विश्वकोश' या विषयावर माहितीपर मार्गदर्शन व त्यानंतर ९.३० वाजता मा.श्री.राजाराम नारायण आव्हाड यांचे 'माझ्या मराठीची बोलू कौतुके' या विषयावर विशेष व्याख्यान देण्यात आले.

मराठी भाषा जतन संवर्धन करण्यासाठी मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या 'माझ्या मराठीचे बोलू कौतूके' या विषयावर बोलताना ह.भ.प.राजाराम महाराज आव्हाड म्हणाले की, ''मराठी राजभाषा दिन व मराठी भाषा गौरव दिन हे दोन वेगवेगळे शासन पातळीवरील अत्यंत महत्वाचे उपक्रम असून त्यांचा उद्देश मराठी भाषा जतन संवर्धनासह वृध्दी करणे असा आहे. आपल्या मराठी मातृभाषेचे महत्व जगाला माहित आहे पण ते आपल्याला माहित नसणे हे खरेतर आपले दुर्दैव आहे. मराठी भाषेइतकी श्रीमंत भाषा दुसरी कोणतीच नाही. मराठी माणूस स्वत: इतका भाषा प्रभुत्व आणि भाषा वैभवाने श्रीमंत असूनही तो स्वत:पेक्षा दुसऱ्या भाषिकाला मात्र अधिक किंमत देतो. स्वत:ला कमी समजतो. त्याला त्याची भाषा श्रीमंती ज्ञात नसते म्हणून प्रत्येक मराठी भाषिकाने स्वभाषाभिमान जपायला शिकले पाहिजे.'' मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने ग्रंथालय विभागाच्यावतीने मराठी भाषेतील कोश वाङ्मय व कविवर्य वि.वा.शिरवाडकर यांच्या साहित्यसंपदेचे एक

दिवशीय ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. याप्रसंगी ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा.विजय कांगणे यांनी मराठी कोश वाङ्मयविषयी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण सखोल माहिती दिली तर प्रा.बाबासाहेब कासार यांनी कुसुमाग्रज यांची सुप्रसिध्द असलेली 'कणा' कवितेचे गायन करुन वाहवा मिळवली. पुढे ह.भ.प.राजाराम आव्हाड म्हणाले की, ''मराठी भाषेत एकच भावभावना, विचार अधिक परीणामकारकरित्या व्यक्त करण्यासाठी वेगवेगळे अर्थछटादर्शक शब्द वापरता येतात. असे भाषिक वैशिष्टये अन्य कुठल्याच भाषेत आढळत नाही. व्यक्तीला आजच्या काळात कितीही परकीय भाषा येत असल्या तरी स्वत:ची मातृभाषा हीच त्याला खऱ्या अर्थाने ज्ञान देणारी भाषा असते. याशिवाय व्यक्तीच्या संकट किंवा दु:खाच्या वेळी पहिला नकळत सहज उद्गार मातृभाषेतूनच निघतो.'' मराठी भाषा जेवढी सोपी तेवढेच अवघड कशी आहे ते त्यांनी विविध उदाहरणातून स्पष्ट केले. तुम्हाला तुमच्या आई वडिलांचे स्वप्न साकार करायचे असेल तर मराठी भाषेची अडचण नसून सर्वात जवळची ज्ञानभाषा आहे म्हणून अशा या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे गरजेचे आहे असे मतही या निमित्ताने श्री.राजाराम आव्हाड यांनी व्यक्त केले.

**- प्रा.वाकचौरे एन्. बी.** (विभाग प्रमुख)

○○○

## - इंग्रजी विभाग -

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी विभाग अंतर्गत विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदर उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व कला गुणांना चालना मिळण्यास निश्चितच मदत मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षामध्ये इंग्रजी विभागा मार्फत अनेक उपक्रम राबवण्यात आले. त्यापैकी उल्लेखनिय उपक्रम विद्यार्थ्यासाठी "Importance of English Language in Indai" तसेच "Modern Trends in English Literature" या विषयावर विभागातील विद्यार्थ्यांचे सेमिनारचे यशस्वी आयोजन विभागामार्फत केले गेले. तसेच तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांनी विविध विषयावर संशोधन अहवाल विभागातील सहाय्यक प्राध्यापकांच्या मार्गदर्शना खाली सादर केली असुन त्यातुन विद्यार्थ्याला संशोधन प्रवृत्तीमध्ये निश्चित वाढ होईल अशी खात्री आहे.

इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमामध्ये यशस्वी सहभाग नोंदविला असुन यामध्ये तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थीनी कु.थोरात कांचन उत्तम हीने आंतर शाखीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे.

इंग्रजी विभागाअंतर्गत चालु शैक्षणिक वर्षापासुन Spoken English साठी Certificate Course सुरु करण्यात आला असुन त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे इंग्रजी अभ्यास मंडळ यांची मान्यता प्राप्त झाली आहे. त्या Course साठी कला व वाणिज्य या दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांना झाली आहे.

इंग्रजी विभागामध्ये विद्यार्थ्यांसाठी Language Laboratory ची सुविधा उपलब्ध असुन तिचा सुयोग्य वापर विभागातील विद्यार्थ्यांकडून नियमित सुरु आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील गुणवंत विद्यार्थी F.Y. B.Com. (Additional English) मध्ये कु.म्हस्के अश्विनी दत्तात्रय ही 8500 CGPA Credit

मिळवुन प्रथम आली. तसेच S. Y. B. A. (English Special) मध्ये कु.मोरे योगेश संतु हा विद्यार्थी 863 CGPA इतके Credit मिळवुन प्रथम आला असुन तृतीय वर्ष कला इंग्रजी विभागात कु.तेलुरे प्रविण काशिनाथ हा विद्यार्थी 80 % गुण मिळवुन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तसेच व क त्‌ त्‌ व स्पर्धेत कुमारी कांचन उत्तम थोरात हिने प्रथम क्रमांक मिळविला.

**F.Y.B.A. (2021-2022 - CGPA)**

| | | |
|---|---|---|
| 1) | Sangale Pradip Deoram | 8.167 |
| 2) | Mhaske Kavita Nivrutti | 8.833 |
| 3) | Mhaske Ashwini Dattatray | 8.500 |
| 4) | Kardel Savita Bhojdas | 7.667 |
| 5) | Avhad Shital Sopan | 7.167 |

**S.Y.B.A. (2020-2021 - Out of 1200)**

| | | |
|---|---|---|
| 1) | Avhad Amit Dagu | 7.88 |
| 2) | Avhad Rahul Devram | 8.38 |
| 3) | Gaikwad Rajesh Kailas | 8.00 |
| 4) | More Yogesh Santu | 8.63 |
| 5) | Thorat Kanchan Ottam | 8.09 |

**T.Y.B.A. (2013 Pattern CGPA)**

| | | |
|---|---|---|
| 1) | Avhad Suraj Janardhan | 756 |
| 2) | Gangurde Mayur Ramesh | 826 |
| 3) | Ingale Nutan Popat | 727 |
| 4) | Jadhav Sachin Dashrarth | 792 |
| 5) | Pawar Archana Goraksha | 843 |
| 6) | Pawar Trupti Navanath | 771 |
| 7) | Sanap Rani Dattatray | 762 |
| 8) | Telure Pravin Kashinath | 869 |
| 9) | Yerunele Pooja Sudam | 720 |

- **प्रा.आव्हाड सोमनाथ श्रीपत** (विभाग प्रमुख)

- **प्रा.डॉ.ब्राम्हणे नंदकिशोर योहान** (विभाग प्रमुख)

ooo

## - भूगोल विभाग -

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये भूगोल विभाग अंतर्गत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून सर्वांगीण विकास व्हावा या हेतूने भूगोल विभाग अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कोविड १९ या विषाणूंच्या प्रादुर्भावामुळे नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीमध्ये ऑनलाइन पध्दतीने गूगल मीट या अँप द्वारे ऑनलाइन लेक्चर (तासिका) घेण्यात आल्या. तसेच १४ जानेवारी २०२२ रोजी भूगोल दिनाचे औचित्य साधून भूगोल विभाग अंतर्गत भूगोल विषयातील करिअरच्या संधी या विषयावर आधारित, एच. पी. टी. कॉलेज, नाशिक या महाविद्यालयातील भूगोल विभागातील तज्ञ प्राध्यापिका सौ.प्रगती देशमुख यांनी गुगल मीट या अँपद्वारे सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन केले. यामध्ये GIS, विविध सॉफ्टवेअर, सर्वेक्षण आदी भौगोलिक घटकांचे मार्गदर्शन व उपयोजन सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस पृथ्वीगोलाचे पूजन प्रभारी प्राचार्य भाबड एस. बी. यांनी केले. याप्रसंगी सर्व प्राधापक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रात्यक्षिक विषयअंतर्गत एस. वाय. बी. ए. व टी. वाय. बी. ए. या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी दोडी बु ।।, कनकोरी, चास, मुसळगाव या गावांवर आधारित ग्राम सर्वेक्षण अहवाल बनविला. यामध्ये गावातील भौगोलिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक माहिती, शेती, व्यवसाय व प्रत्यक्ष घरोघरी जाऊन प्रश्नावली भरुन घेतली. तसेच एस.वाय.बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रमाण रेषा, प्रक्षेपण, आलेख सर्वेक्षण, (समतल फलक सर्वेक्षण व डम्पी संतलन सर्वेक्षण) या प्रात्यक्षिकाचे उत्कृष्ट अशी प्रात्यशिक वही JOURNAL तयार केली. तसेच टी. वाय. बी. ए. या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी नकाशाशास्त्र, स्थलदर्शक नकाशे

वाचन, हवामान दर्शक नकाशे वाचन, हवामान विषयक विविध उपकरणे, सांख्यिकीय पध्दती यावर आधारित उत्कृष्ट अशी प्रात्यक्षिक वही JOURNAL तयार केली.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व सर्व विषयांमध्ये गोडी निर्माण व्हावी या हेतूने भूगोल विभाग अंतर्गत सेमिनार, गट चर्चा, पर्यावरण दिन यांचे आयोजन करण्यात आले.

भूगोल विभाग प्रमुख प्राध्यापक कासार बी. एच. यांनी GIS Impact of Soil Salinity and its Management for Agriculture Development in Sangamner Tehsil. या विषयावर आंतरराष्ट्रीय संशोधन पेपर लिहिला व सादर केला. तसेच प्रा.कासार बी.एच यांनी आर्ट्स आणि कॉमर्स महाविद्यालय दौडी बु. राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर खंबाळे येथे जागतिक तापमान वाढ या विषयावर राष्ट्रीसेवा योजनेतील सर्व स्वयंसेवकांना व्याख्यानपर मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण जाणीव जागृती काळाची गरज याविषयी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**- प्रा.कासार बी. एच्.** (विभाग प्रमुख)

ooo

## - राज्यशास्त्र विभाग -

सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात राज्यशास्त्र विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे Online/ Offline पध्दतीने आयोजन करण्यात आले.

■ सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात राज्यशास्त्र विभागात द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.) प्रवेशित विद्यार्थी १६ व तृतीय वर्ष कला (T.Y.B.A.) प्रवेशित विद्यार्थी १६ होते.

■ दिनांक २७ जुलै २०२१ रोजी देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद राज्यशास्त्र विभागाअंतर्गत आयोजित "Indian Constitution : Secularism, Democracy and Nationalism" या एक दिवशीय राष्ट्रीय Webinar मध्ये सहाय्यक प्राध्यापक संदिप भाबड यांनी सहभाग घेतला.

■ दिनांक ७ ऑगस्ट २०२१ रोजी देवचंद महाविद्यालय अर्जूननगर, ता.कागल, जि.कोल्हापूर व विजयसिन्हा यादव महाविद्यालय, पेठ-वडगांव आयोजित महिला सक्षमीकरण आणि वास्तव या एकदिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळेत सहाय्यक प्राध्यापक संदिप भाबड यांनी सहभाग घेतला.

■ दि.२० ऑगस्ट २०२१ रोजी "KVPS's Kisan Arts, commerce and science College, Parola, Dist-Jalgaon व Maharashtra Political Science and public Administration conference" यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "The Trajectory of Indian Nationalism" या आंतरविद्याशाखीय E-Conference मध्ये सहाय्यक प्रा.संदिप भाबड यांनी सहभाग घेतला.

■ दिनांक १९ जुलै ते १७ ऑगस्ट २०२१ या कालावधीत रामानूजन महाविद्यालय दिल्ली विद्यापीठ व खालसा महाविद्यालय अमृतसर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित 4 -Week Induction/Orientation Programme सहा प्रा.संदिप भाबड यांनी यशस्वीरित्या A+ श्रेणीत उत्तीर्ण केला.

■ दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी-नाशिक आयोजित "Indian Citizens and Common Laws" या एकदिवशीय राज्यस्तरीय Webinar मध्ये सहा.प्राध्यापक संदिप भाबड यांनी सहभाग घेतला.

■ दिनांक २९ नोव्हेंबर २०२१ रोजी डॉ.एच. एन. सिन्हा कला आणि वाणिज्य महाविद्यालय, पातूर, जि.अकोला व यशवंत महाविद्यालय, सेलू जि.वर्धा यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित "Indian constitution & Routing of Democracy" या एकदिवशीय राष्ट्रीय सेमिनार मध्ये सहाय्यक प्राध्यापक संदिप भाबड यांनी सहभाग घेतला.

■ दिनांक ३१ जानेवारी २०२२ रोजी बलभीम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बीड आयोजित - Gender Equality in Education (GEE-2022) या एकदिवशीय राष्ट्रीय सेमीनार मध्ये सहाय्यक प्राध्यापक संदिप भाबड यांनी सहभाग घेतला.

■ दिनांक १४ व १५ फेब्रुवारी २०२२ रोजी Matterhere आयोजित "Effective Research Paper" या दोन दिवशीय राष्ट्रीय कार्यशाळेत सहाय्यक प्राध्यापक संदिप भाबड यांनी सहभाग घेतला.

■ विभागातील विद्यार्थ्यांसाठी जागृत मतदार या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले.

■ दिनांक ११ व १२ एप्रिल २०२२ रोजी क्रांतीवीर वसंतराव नारायणराव नाईक महाविद्यालय नाशिक आयोजित "Azadi ka Amrut Mahotsav : A Road Map to Women Empowerment In India" या दोन दिवशीय राष्ट्रीय सेमानार मध्ये ग्रामीण महिलांना सक्षम बनवा दारिद्र्य आणि उपासमार हटवा हा शोधनिबंध सहाय्यक प्राध्यापक संदिप भाबड यांनी सादर केला.

■ F.Y.B.A., S.Y.B.A., T.Y.B.A. या वर्गातील विषयांच्या तासिका Online/Offline पध्दतीने घेऊन वेळेत अभ्यासक्रम शिकवून पूर्ण केला गेला.

- **प्रा.भाबड एस्. बी.** (विभाग प्रमुख)

OOO

## - वाणिज्य विभाग -

श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागांतर्गत विविध कार्यक्रम व अभ्यास भेट घेण्यात आली तसेच विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. विविध कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली.

दिनांक २३ नोव्हेंबर २०२१ रोजी वाणिज्य विभागांतर्गत श्री. तुकाराम दिघोळे सेकंडरी टिचर्स को.ऑप क्रेडिट सोसायटी येथे अभ्यास भेट घेण्यात आली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना क्रेडिट सोसायटीचे दैनंदिन व्यवहार कसे होतात. व्यवहारांची नोंदणी खतावणीमध्ये कशी केली जाते? याची माहिती मिळाली.

दिनांक १ फेब्रुवारी २०२२ रोजी श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्युनिअर कॉलेज येथे वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांना कॉमर्स शाखेतील करिअर्स मधील संधी या विषयावर विद्यार्थींना मार्गदर्शन केले.

दिनांक २६ फेब्रुवारी २०२२ रोजी टी. वाय. बी. कॉम. च्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके कशी सादर करावयाची या साठी कार्यशाळा झुम अॅपद्वारे घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी प्रमुख व्याख्याते म्हणून मा.श्री.अंबादास कापडी व मा.श्री.आव्हाव हे होते. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांबद्दल पुर्ण माहिती मिळून ज्ञानामध्ये भर पडली. विद्यार्थ्यांना Goods & Services Tax या विषयाची अधिक माहिती व्हावी म्हणून महाविद्यालयामध्ये हा नविन विषय सुरु करण्यात आला. या विषयामुळे विद्यार्थ्यांना GST Registration, Input Tax Credit, Return Filling Process या संदर्भात प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात आले. दिनांक जुन २०२२ रोजी दरवर्षी प्रमाणे वाणिज्य विभागांतर्गत Mr.Commerce व Mrs.Commerce या स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली.

- **प्रा.उगले प्रशांत सुर्यभान** (विभाग प्रमुख)

- **प्रा.बलक सोमेश्वर किरण** (सदस्य)

- **प्रा.श्रीमती घुगे कल्पना किसन** (सदस्य)

OOO

## - ज्ञान प्रबोधिनी -

श्री ब्रम्हानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये ज्ञान प्रबोधिनी या नवउपक्रमाची सुरुवात करण्यात आली. ज्ञान प्रबोधिनीचे पहिले पुष्प दिनांक १२ ऑगस्ट २०२१ रोजी प्रा.निलेश वाकचौरे यांनी ''लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या गीतातील संविधानीक मुल्य विचार'' या विषयावर सखोल ज्ञान दिले

ज्ञान प्रबोधनीचे दुसरे पुष्प दिनांक ०९-१०-२०२१ रोजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.संदीप भाबड यांनी ''भारतीय संविधान'' या विषयावर विचार मांडले यात त्यांनी संविधानाची मुल्य व्यक्तीचे कर्तव्य, मुलभूत अधिकार या विषय माहिती दिली.

ज्ञान प्रबोधनीचे तिसरे पुष्प दिनांक २३ डिसेंबर २०२१ रोजी प्रा.उगले प्रशांत यांनी डिजिटल इंडिया या विषयावर माहिती दिली यात डिजिटिल इंडियामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा या विषयी माहिती दिली.

ज्ञान प्रबोधनीचे चौथे पुष्प दिनांक १७-०१-२०२२ रोजी प्रा.सामेश्वर बलक यांनी 'धर्मादाय संस्थेचे पुस्तक पालन' या विषयावर माहिती दिली. यात धर्मादाय संस्थेचे नफा तोटा तंत्र व ताळेबंद कागदपत्रे याविषयी माहिती दिली.

अशा प्रकारे ज्ञान प्रबोधिनी हे प्राध्यापक वर्गामध्ये एक नव संशोधकाची प्रेरणा सतत जागृती ठेवण्याचे काम करते.

**- प्रा.कांगणे व्ही. आर.** (विभाग प्रमुख)

**- प्रा.आव्हाड एस्. एस्.** (सदस्य)

**- प्रा.आव्हाड ए. एम्.** (सदस्य)

❍❍❍

## - इतिहास विभाग -

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००५-२००६ पासून इतिहास हा विषय विशेष स्तरावर सुरु करुन स्वतंत्र इतिहास विभागाची सुरुवात झाली. शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ या वर्षात इतिहास विभागात द्वितीय वर्ष कला १३ विद्यार्थी व तृतीय वर्ष कला शाखेत १५ विद्यार्थी प्रवेशित होते. महाविद्यालयात इतिहास मंडळाची स्थापना करण्यात आली. त्याअंतर्गत वेगवेगळे उपक्रम आयोजित करण्यात आले. Covid-19 या साथीच्या महामारीमुळे काही उपक्रम व वर्षभरातील तासिका Online व Offline पध्दतीने घेण्यात आल्या तर या विभागातील विद्यार्थ्यांसाठी समाज सुधारकांचे योगदान या विषयावर चर्चासत्रांचे आयोजन करुन त्यांना प्रोत्साहीत करण्यात आले.

**- प्रा.आर. ए. केदार** (विभाग प्रमुख)

❍❍❍

## - स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र -

महाविद्यालयात वर्षभर सातत्याने स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्गत स्पर्धा परीक्षाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते त्याचाच एक भाग म्हणून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षासाठी ऑनलाईन व ऑफलाईन विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले व महाविद्यालयातील विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तकाचे अध्ययन करुन व विविध प्रकारच्या संदर्भ ग्रंथाचे अभ्यासातून स्पर्धा परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेले आहेत.

**- प्रा.कांगणे व्ही. आर.** (विभाग प्रमुख)

❍❍❍

## ..महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद..

| अ.नं. | प्राध्यापकाचे नांव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| 1. | प्रभारी प्राचार्य श्री.भावड संदिप भागुजी | M.A. (Politics), SET, NET, M.B.A. (H.R.) |
| 2. | प्रा.श्री.वाकचौरे निलेश भाऊसाहेब | M.A. (Marathi), B.Ed., NET |
| 3. | प्रा.श्री.उगले प्रशांत सुर्यभान | M.Com., SET, M.B.A., G. D. C. & A., C.A. (Inter) |
| 4. | प्रा.श्री.केदार राजेंद्र आनंदा | M.A.(History), B.Ed., SET, M.Phil., |
| 5. | प्रा.श्री.बलक सोमेश्वर किरण | M.Com. C.A. (Inter), G.D.C. & A. DTL, SET |
| 6. | प्रा.श्री.कांगणे विजय राजाराम | M.A., M.Lib., M.Phil., NET, SET |
| 7. | प्रा.श्री.आव्हाड अरुण मधुकर | M.A. (Economics), B.Ed. |
| 8. | प्रा.श्री.आव्हाड सोमनाथ श्रीपत | M.A. (English), B.Ed., SET, |
| 9. | प्रा.श्रीमती घुगे कल्पना किसन | M.Com., B.Ed., M.Phil. |
| 10. | प्रा.डॉ.श्रीमती शेख निलोफर अन्वर | M.A (Economics), M.Phil., B.Ed., Ph.D. |
| 11. | प्रा.श्री.कासार बाबासाहेब हरिभाऊ | M.A. (Geography & Marathi), B.Ed., SET |
| 12. | प्रा.डॉ.श्री.ब्राम्हणे नंदकिशोर योहान | M.A. (English), B.Ed., Ph.D. |

## ..महाविद्यालयातील सेवक वृंद..

| अ.नं. | सेवकाचे नांव | शैक्षणिक पात्रता | हुद्दा |
|---|---|---|---|
| १. | श्री.आव्हाड रामदास बाजीराव | M.A. (Politics) | मुख्य लिपीक |
| २. | श्री.केदार सुकदेव शिवराम | M.A. (Marathi) | वरिष्ठ लिपीक |
| ३. | श्री.आव्हाड विठ्ठल दादा | S.S.C. | कनिष्ठ लिपीक |
| ४. | श्री.केदार खंडेराव भिमा | B.A. (Politics) | शिपाई |
| ५. | श्री.गोसावी भाऊसाहेब ज्ञानेश्वर | H.S.C. | शिपाई |
| ६. | श्री.उगले खंडेराव संपत | H.S.C. | शिपाई |
| ७. | श्री.शिंदे निवृत्ती साहेबराव | M.A. (History) | शिपाई |

# ..महाविद्यालय विकास समिती..

| अ.नं. | सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| 1. | मा.श्री.कारभारी पंढरीनाथ आव्हाड | अध्यक्ष |
| 2. | मा.श्री.निवृत्ती गणपत केदार | सदस्य |
| 3. | मा.श्री.एकनाथ शिवराम आव्हाड | सदस्य |
| 4. | मा.ॲड.श्री.दत्तात्रय चिमाजी केदार | सदस्य |
| 5. | मा.श्री.चंद्रभान शिवाजी जाधव | सदस्य |
| 6. | मा.श्री.गणेश म्हाळु आव्हाड | माजी विद्यार्थी प्रतिनिधी |
| 7. | मा.प्रा.श्री.विजय राजाराम कांगणे | प्राध्यापक प्रतिनिधी |
| 8. | मा.प्रा.श्री.राजेंद्र आनंदा केदार | प्राध्यापक प्रतिनिधी |
| 9. | मा.प्रा.श्री.प्रशांत सुर्यभान उगले | प्राध्यापक प्रतिनिधी |
| 10. | मा.प्रा.श्री.सोमेश्वर किरण बलक | समन्वयक (गुणवत्ता हमी समिती) |
| 11. | मा.प्रा.श्री.निलेश भाऊसाहेब वाकचौरे | प्राध्यापक प्रतिनिधी |
| 12. | मा.श्री.रामदास वाजीराव आव्हाड | प्रशासकीय सेवक प्रतिनिधी |
| 13. | मा.श्री.संदिप भागुजी भावड | पदसिध्द सचिव |

# ..IQAC कमिटी..

| अ.नं. | सदस्याचे नांव | पदनाम | हुद्दा |
|---|---|---|---|
| 1. | मा.प्रा.श्री.संदीप भागुजी भावड | प्राचार्य | अध्यक्ष |
| 2. | मा.प्रा.श्री.सोमेश्वर किरण बलक | सहाय्यक प्राध्यापक | समन्वयक |
| 3. | मा.श्री.कारभारी पंढरीनाथ आव्हाड | संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| 4. | मा.श्री.किसन शंकर आव्हाड | औद्योगिक तज्ञ | सदस्य |
| 5. | मा.ॲड.श्री.दत्तात्रय चिमाजी केदार | बहिस्थ तज्ञ | सदस्य |
| 6. | मा.प्रा.श्री.पोपट एकनाथ आव्हाड | शैक्षणिक तज्ञ | सदस्य |
| 7. | मा.श्री.नवनाथ शिवाजी आव्हाड | सामाजिक कार्यकर्ते | सदस्य |
| 8. | मा.प्रा.श्री.निलेश भाऊसाहेब वाकचौरे | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य |
| 9. | मा.प्रा.श्री.राजेंद्र आनंदा केदार | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य |
| 10. | मा.प्रा.श्री.सोमनाथ श्रीपत आव्हाड | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य |
| 11. | मा.प्रा.श्री.बाबासाहेब हरिभाऊ कासार | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य |
| 12. | मा.प्रा.श्रीमती.निलोफर अन्वर शेख | सहाय्यक प्राध्यापक | सदस्य |
| 13. | मा.प्रा.श्री.विजय राजाराम कांगणे | ग्रंथपाल | सदस्य |
| 14. | मा.श्री.रामदास वाजीराव आव्हाड | मुख्य लिपिक | सदस्य |
| 15. | मा.श्री.गणेश म्हाळू आव्हाड | माजी विद्यार्थी | सदस्य |

## ...ॲन्टी रॅगिंग कमिटी...

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | मा.प्रा.श्री.संदिप भागुजी भावड | प्रभारी प्राचार्य | अध्यक्ष | 7798775033 |
| 2. | मा.प्रा.श्री.निलेश भाऊसाहेब वाकचौरे | प्राध्यापक | सचिव | 9657995827 |
| 3. | मा.प्रा.श्री.प्रशांत सुर्यभान उगले | प्राध्यापक | सदस्य | 9766907818 |
| 4. | मा.प्रा.श्रीमती कल्पना किसन घुगे | प्राध्यापिका | सदस्या | 8796554901 |
| 5. | मा.श्री.रामदास बाजीराव आव्हाड | प्रशासकीय सेवक प्रतिनिधी | सदस्य | 9405587854 |
| 6. | मा.श्री.नवनाथ शिवाजी आव्हाड | पत्रकार, दै.पुण्यनगरी | सदस्य | 7588618213 |
| 7. | मा.श्री.सागर कोते (API) | पोलिस प्रशासन | सदस्य | (02551) 283433 |
| 8. | मा.श्री.विठ्ठल दादा आव्हाड | पालक | सदस्य | 9657763966 |
| 9. | कु.ऋतुजा रामदास घुगे | विद्यार्थीनी | सदस्य | 7218323106 |

## ...ॲन्टी रॅगिंग स्कॉड कमिटी...

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | मा.प्रा.श्री.संदिप भागुजी भावड | प्राचार्य | अध्यक्ष | 7798775033 |
| 2. | मा.प्रा.श्री.प्रशांत सुर्यभान उगले | प्राध्यापक | उपाध्यक्ष | 9766907818 |
| 3. | मा.प्रा.श्री.निलेश भाऊसाहेब वाकचौरे | प्राध्यापक | सचिव | 9657995827 |
| 4. | मा.प्रा.श्रीमती कल्पना किसन घुगे | प्राध्यापिका | सदस्या | 8796554901 |
| 5. | मा.प्रा.डॉ.श्रीमती निलोफर अन्वर शेख | प्राध्यापिका | सदस्या | 9309599450 |
| 6. | मा.श्री.रामदास बाजीराव आव्हाड | प्रशासकीय सेवक प्रतिनिधी | सदस्य | 9405587854 |

## ...महिला तक्रार निवारण समिती...

| | | |
|---|---|---|
| 1) | प्रभारी प्राचार्य मा.प्रा.संदिप भागुजी भावड | अध्यक्ष |
| 2) | मा.प्रा.श्रीमती कल्पना किसन घुगे | सदस्या |
| 3) | मा.प्रा.डॉ.श्रीमती निलोफर अन्वर शेख | सदस्या |
| 4) | मा.प्रा.राजेंद्र आनंदा केदार | सदस्य |
| 5) | मा.श्री.रामदास बाजीराव आव्हाड | सदस्य |
| 6) | मा.श्री.सुकदेव शिवराम केदार | सदस्य |
| 7) | मा.श्री.विठ्ठल दादा आव्हाड | सदस्य |

# ..प्राध्यापक वृंद..



प्रा.भावड एस. बी.
(प्रभारी प्राचार्य)



प्रा.वाकचौरे एन. बी.



प्रा.उगले पी. एस.



प्रा.केदार आर. ए.



प्रा.बलक एस. के.



प्रा.कांगणे व्ही.आर.



प्रा.आव्हाड ए. एम.




प्रा.आव्हाड एस. एस.



प्रा.श्रीमती घुगे के. के.



प्रा.डॉ.श्रीमती शेख एन. ए.



प्रा.कासार बी. एच.



प्रा.डॉ.ब्राम्हणे एन. वाय.

# ..प्राध्यापकेत्तर कर्मचारी वृंद..


श्री.आव्हाड आर. बी.
(मुख्य लिपिक)


श्री.केदार एस. एस.
(वरिष्ठ लिपिक)


श्री.आव्हाड. व्ही. डी.
(कनिष्ठ लिपिक)


श्री.केदार के. बी.
(शिपाई)


श्री.गोसावी बी. डी.
(शिपाई)


श्री.उगले खंडेराव संपत
(शिपाई)


श्री.शिंदे एन. एस.
(शिपाई)


'१५ ऑगस्ट' दिना निमित्ताने महाविद्यालयातील
सर्व प्राध्यापक वृंद...

## दोडी येथील महाविद्यालयात राजभाषा गौरव दिन साजरा

सिन्नर : प्रतिनिधी

तालुक्यातील दोडी येथील श्री ब्रह्मानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विभाग आयोजित कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज जयंती तसेच मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. राजभाषा दिन गौरव दिनानिमित्त ऑनलाइन मीटिंग द्वारा माझ्या मराठीची बोलू कौतुके या विषयावर ... आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त व युवा व्याख्याते प्राध्यापक दीपक राऊत यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी निलेश वाकचौरे, राष्ट्रीय विकास योजना अधिकारी प्रा. प्रशांत उगले, प्रा. सोमनाथ आव्हाड, प्रा. राजेंद्र केदार, कल्पना पुरी आदींसह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. निलेश वाकचौरे व कवी जगदीश पवार यांनी केले तर आभार प्रशांत उगले यांनी मानले.

लोकमत

## माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा...

मराठी भाषा गौरव दिनी जिल्ह्यात विविध उपक्रम : ऑनलाईन व्याख्यान, कविसंमेलन रंगले

### दोडी महाविद्यालयात ऑनलाइन व्याख्यान व कविसंमेलन

सिन्नर : पुढारी वृत्तसेवा

दोडी बुद्रुक येथील श्री ब्रह्मानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज जयंती तसेच मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

मराठी राजभाषा दिन व मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने ऑनलाइन गुगल मिटिंगद्वारे 'माझ्या मराठीचे बोलु कौतुके' या विषयावर युवा व्याख्याते प्रा. दीपक राऊत यांनी मार्गदर्शन केले. युवा कवी जगदीश पवार यांच्या मार्गदर्शनाने ऑनलाइन कविसंमेलनाही घेण्यात आले.

कवी कांतासुत प्रमोद पोहरडे (अहमदनगर) यांनी 'कोणत्या मातीचा कवन बाप', जगदीश पवार (जळगाव) यांनी 'मी आणि ती', अमोल चिने (नाशिक) यांनी 'बाप', शिक्षणशाळाचे आकाश कासार (जळ) यांनी शेतकरी 'राजा', शंकर शिंदे (जळ) यांनी 'तमाशा', अर्जुन राठोड (बीड) यांनी 'बाप', कवयित्री मधुरी वनवे (नाशिक) यांनी 'माझी मराठी', सुजाता साबळे (जळ) यांनी 'निसर्ग', ऐश्वर्या नेहे (जळ) यांनी 'कविता', प्रा. नीलेश वाकचौरे (नाशिक) यांनी 'पावसाळी जिंदगी' आदी कविता सादर केल्या. प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड यांनी प्रास्ताविक तर कविसंमेलनाचे सूत्रसंचालन प्रा. नीलेश वाकचौरे यांनी केले.

### दोडीच्या कला, वाणिज्य महाविद्यालयात मराठी भाषा दिन साजरा


सिन्नर : तालुक्यातील दोडी येथील श्री ब्रह्मानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय बुद्रुक येथे विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विभागातर्फे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त ऑनलाइन मीटिंगद्वारा 'माझ्या मराठीचे बोलु कौतुके' या विषयावर आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त व युवा व्याख्याते प्राध्यापक दीपक राऊत यांनी मार्गदर्शन केले. मराठीसाठी स्वतंत्र मराठी विद्यापीठ निर्माण व्हावे, असे मत राऊत यांनी व्यक्त केले. कवी प्रमोद पोहरडे, जगदीश पवार, अमोल चिने, आकाश कासार, शंकर शिंदे, अर्जुन राठोड, कवयित्री मधुरी वनवे, सुजाता साबळे, ऐश्वर्या नेहे, विद्यार्थी विकास मंडळाचे अधिकारी तथा प्राध्यापक नीलेश वाकचौरे यांनी विविध कविता सादर केल्या. याप्रसंगी राष्ट्रीय विकास योजना अधिकारी प्रा. प्रशांत उगले, प्रा. सोमनाथ आव्हाड, प्रा. राजेंद्र केदार, कल्पना पुरी यांसह प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड यांनी प्रास्ताविक, नीलेश वाकचौरे व जगदीश पवार यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रशांत उगले यांनी आभार मानले.

### दोडी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

सिन्नर : प्रतिनिधी

तालुक्यातील दोडी येथील महाविद्यालयात ग्रंथालय विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयामध्ये वाचन चळवळ वृध्दी, काळाची गरज या विषयावर ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. विजय काळणे यांनी व्याख्यान दिले. वाचन चळवळ ही समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने आठवड्यात एक पुस्तक वाचले पाहिजे. वाचन हे कर्तव्य नाही तर छंद जोपासले जावे असे ते म्हणाले. प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड यांनी जीवनातील वाचनाचे महत्त्व विषद केले. विद्यार्थी दशेत लागलेली वाचनाची गोडी चीर काळ टिकते, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो असे ते म्हणाले. कार्यक्रम अधिकारी निलेश वाकचौरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सोमेश्वर बलक यांनी आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

### दोडी महाविद्यालयात पोषण आहार महिना




### महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

दोडी । येथील महाविद्यालयात ग्रंथालय विभाग, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयामध्ये 'वाचन चळवळ वृध्दी, काळाची गरज' या विषयावर ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. विजय काळणे यांनी व्याख्यान दिले. वाचन चळवळ ही समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने आठवड्यात एक पुस्तक वाचले पाहिजे. वाचन हे कर्तव्य नाही तर छंद जोपासले जावे असे ते म्हणाले. प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड यांनी जीवनातील वाचनाचे महत्त्व विषद केले. विद्यार्थी दशेत लागलेली वाचनाची गोडी चीर काळ टिकते, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होतो असे ते म्हणाले. कार्यक्रम अधिकारी निलेश वाकचौरे यांनी प्रास्तविक केले. प्रा. सोमेश्वर बलक यांनी आभार मानले.

दिव्य मराठी दि. ०६/१०/२०२१

### दोडी महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन

प्रतिनिधी : सिन्नर

श्री ब्रह्मानंद स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालय दोडी बुद्रुक येथे राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ यांच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्रभारी प्राचार्य एस. बी. भावड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. प्रशांत उगले, प्रा. नीलेश वाकचौरे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. नीलेश वाकचौरे, ... समन्वयक प्रा. सोमेश्वर बलक, प्रा. अरुण आव्हाड, प्रा. विजय काळणे, प्रा. सोमनाथ आव्हाड, प्रा. बाळासाहेब कासार, प्रा. कल्पना पुरी, निवृत्ती शिंदे आदी उपस्थित होते.

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

- सुंदर, प्रदुषणमुक्त व सी.सी.टी.व्ही निगराणी खाली महाविद्यालयीन परिसर...
- महाविद्यालयाची भव्य तसेच आकर्षक वास्तु व सुसज्ज सेमिनार हॉल...
- सर्व सुविधांयुक्त संगणक विभाग...
- विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय परिसरात वायफाय सुविधा उपलब्ध...
- शिस्तप्रिय महाविद्यालय म्हणून पंचक्रोशीतील ओळख...
- अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद...
- लॅग्वेज लॅब व विपुल ग्रंथसंग्रहीत ग्रंथालय...
- हुशार व गरीब विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना...
- विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना (NSS)...
- सर्व शाखांना विशेष स्तरावरील विषय शिकविण्याची सोय...
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकडे वैयक्तिक व विशेष लक्ष...
- शैक्षणिक, औद्योगिक व विविध अभ्यास भेट सहलीचे आयोजन...
- सांस्कृतिक स्नेहसंमेलन व वार्षिक नियतकालिक प्रकाशन...
- भव्य क्रीडांगण व कॅन्टीन सुविधा उपलब्ध...
- उत्कृष्ट निकालाची अखंड परंपरा...
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र...
- विविध शिष्यवृत्ती योजना...



|| पंकज || 295311/9860166380